MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे / अंक २ / फेब्रुवारी २०१९

## संपादकीय

### संस्कृत, जर्मनी आणि Oriental Renaissance

१८१८ साल भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे वर्ष ठरले. १८१८ लाच पेशवाई खालसा झाली आणि इंग्रजांच्या वसाहतवादाने बहुतेक सर्व भारताचा ताबा घेतला. १८१८ साली जरी भौगोलिक ताबा इंग्रजांना मिळाला असला तरी प्रत्यक्ष राज्य करण्याकरता लागणाऱ्या न्याय, महसुलापासून, प्रशासनाच्या व्यवस्था त्यांच्या ताब्यात आल्या नव्हत्या. ८-९ व्या शतकात सिंधमध्ये सुरू झालेलं इस्लामी आक्रमण १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात थोपवलं असलं तरी या १००० वर्षांत, कायम युद्ध सदृश परिस्थितीमुळे या व्यवस्था कमकुवत झाल्या होत्या. सहाजिकच बाबरापासून औरंगजेबापर्यंत मुघल राज्यकर्त्यांनी त्यांच्या मूळ संस्कृतीला सोइस्कर असे अनेक पदरही या व्यवस्थांमधून आणले होते. यामुळेच आपल्या प्राकृत भाषांमध्ये, दैनिक प्रशासकीय व्यवहारात अनेक पर्शियन शब्दांचा प्रादूर्भाव झाला होता.

स्वराज्य हे भौगोलिक जेवढे असते, तेवढेच सांस्कृतिक देखील असते हे शिवाजी महाराजांना चांगलेच समजले होते.

जिवंत रहायला जसे 'अन्न' लागते, तसेच सामाजिक सोय, व संतुलनाकरता अनेक 'व्यवस्था' लागतात. त्या व्यवस्थांचा उगम हा परंपरागत संस्कृतीमध्येच असतो. त्यातूनच त्याच्या वहनाकरता भाषेमध्ये शब्द तयार होतात. त्यांचा अर्थ समजायला कुठल्याही शाळेत कधीच जायला लागत नाही. सांस्कृतिक व्यवहार हीच ती शाळा असते. संस्कृत भाषा ही अशा अर्थपूर्ण सांस्कृतीक शब्दांची खाण आहे. सर्व प्राकृत भाषांनी याचा यथेच्छ उपयोग करून घेतला आहे.

आपण वर उल्लेख केल्याप्रमाणे शिवाजी महाराजांच्या काळात असे अनेक भिन्न सांस्कृतिक छटांचे शब्द प्रशासकीय व्यवहारात आल्यामुळे, संतुलनापेक्षा गोंधळच जास्त निर्माण होत होता. म्हणूनच शिवाजी महाराजांना रघुनाथ पंडिताकडून राज्यव्यवहार कोश लिहून घ्यायला लागला. फारसी शब्दाला अनेक संस्कृत पर्यायी शब्द या कोशामध्ये आहेत.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

दैनंदिन व्यवहाराकरता आपल्या समाजाचे नाते हे नैसर्गिक निसर्गक्रमाशी जोडलेले असते. याकरता पंचांग म्हणजे दिनदर्शिका तयार होत असे. आकाशस्य ग्रहांची परिस्थिती शतकाशतकामध्ये बदलत असते. त्यामुळे पंचांगांमध्येही बदल करावे लागतात. पंचांग म्हणजेही एक सांस्कृतिक व्याकरण असते. शिवाजी महाराजांच्या काळामध्ये प्रत्यक्ष ग्रह परिस्थिती, व त्यावर बेतलेले दैनंदिन व्यवहार यामध्येही तफावत आली होती. शिवाजी महाराजांनी कृष्णदैवज्ञ या ग्रहगणितज्ज्ञाकडून त्यामध्ये सुधारणा करवून आणल्या व 'करणकौस्तुभ' हा ग्रंथ सिद्ध केला. हे सांगण्याचा मूळ उद्देश हाच आहे की, राज्य चालवण्याकरता व्यवस्थांची निर्मिती करायला लागते, किंवा अस्तित्वात असलेल्या व्यवस्थांमध्ये योग्य तो बदल करावा लागतो.

मुघल गेले आणि इंग्रज आले. सहाजिकच इंग्रजी संस्कृतीला साजेसा बदल इंग्रजांनी करायला सुरुवात केली, आणि म्हणूनच १९ वे शतक त्या दृष्टीनी अतिशय महत्त्वाचे शतक आहे. यातला सर्वात मोठा बदल हा शिक्षण व्यवस्थेचा होता. भारतामधील शिक्षणव्यवस्था ही सर्वथा भिन्न होती. भारताच्या सांस्कृतिक व्यवहारांशी त्याची नाळ जोडली होती. समाज हा कौशल्याधारित व्यवसायांवरती विभागला गेला होता आणि या कौशल्याचा विकास हा पिढ्यान्‌पिढ्या केला जात होता. याचे सर्वात चांगले उदाहरण म्हणजे मंदिरांचे (स्थपती) शिल्पी. प्रत्येक मंदिर हे नेटकं, सुबक आणि सौंदर्यपूर्ण होतं यांचं कारण म्हणजे, त्यातील प्रत्येक मूर्ती ही एका गणिती सूत्राने तयार केलेली असते. हे शिल्पकार कुठल्या शाळेत जाऊन गणित शिकत नव्हते, तर त्यातली प्रमाणं ते आपले आईवडील व प्रत्यक्ष कृतीतून शिकत होते. प्रत्यक्ष मंदिर हेच त्यांचे पुस्तक वा कार्यशाळा असे. परंतु आजच्या शिक्षण व्यवस्थेतील आपल्यावरील पगड्यामुळे पर्यायी शिक्षण व्यवस्था असते हे आपण मान्यच करायला तयार नाही. याचा सर्वात मोठा फटका हा आपल्याच व्यवस्थांच्या 'क्षमता' आणि 'उपयुक्तते'वरती झाला.


१८३५ सालच्या मेकॉलेच्या शिक्षण सुधारणांमुळे पंडिती शिक्षण काही प्रमाणात चालू राहिले तरी, त्यातील परंपरागत स्रोत संपूर्णतः लुप्त होउन त्याचे पाश्चिमात्तीकरण झाले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील सुधारकांची पीढीही याच शिक्षणातून निर्माण झाली होती. व्यावसाईक कौशल्यावर आधारीत शिक्षण या नविन पद्धतीमधून संपूर्णतः हद्दपार झाले.

जी गोष्ट दैनंदिन व्यवहारातील भौतिकशास्त्राची आहे तीच गोष्ट तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयाचीही आहे. हा विषय गहन एवढ्याकरताच म्हणायचा की, त्याचेही शिक्षण हे एका वेगळ्या मनोसामाजिक यंत्रणेतून दिले जात असे. आपल्या या व्यवस्थेमधील याचा सर्वात परमोच्च बिंदू म्हणजे 'उपनिषदं' आणि 'षड्‌दर्शनं', आणि त्यांच्या प्रभावाखाली तयार झालेली सांस्कृतीक आणि सामाजिक नीतिमूल्ये.

आपला या विषयातील प्रगतीचा इतिहास हा कमीत कमी ५००० वर्षांचा आहे. अडीच हजार वर्षांपूर्वीचा पाणिनी असो, किंवा १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञ असो, आपल्या विशेष लिखाणाकरता त्यांना आपल्या तत्त्वज्ञानापासून फारकत घ्यावी लागली नाही. विषय व्याकरणाचा असो किंवा गणिताचा, त्यातील वैचारिक प्रगल्भतेकरता, विश्लेषणात्मक मांडणी करता, कमी अधिक प्रमाणात

(पृष्ठ क्र. ३९ वर)

व्ही.पी.एम्.



# दिशा

वर्ष विसावे/अंक २/फेब्रुवारी २०१९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

‘दिशा’ प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्‌,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | मूल्यवेध-१०: सत्त्वर प्रतिसाद | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | मुक्ती व वेड | सौ. भाग्यश्री दत्तात्रय कुलकर्णी | ५ |
| ४) | राष्ट्रीय दिनदर्शिका आणि पारंपरिक पंचांग | श्री. वासुदेव कोल्हटकर | ७ |
| ५) | १९ व्या शतकातील पश्चिम भारतातील आद्यऋषी : बाळशास्त्री जांभेकर | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ९ |
| ४) | पाच लाखाचा पतंग ... | श्री. चन्द्रशेखर टिळक | १४ |
| ५) | सैन्याला ‘सॅल्युट’, बारामुल्ला ‘ऑलआउट’ | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | १७ |
| ६) | जाणिवांचे दिवे | श्री. कमलाकर आत्माराम देसले | २० |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# मूल्यवेध-१०: सत्त्वर प्रतिसाद

*सत्त्वर प्रतिसादाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. सत्वर प्रतिसादाचे महत्त्व या लेखात उदाहरणांसह विशद केले आहे- संपादक*

स्वाभाविकपणे उमटणारा प्रतिसाद सत्त्वर असतो. सरस असतो. उत्स्फूर्त असतो. त्यामुळेच अनेकदा तो हवाहवासाही वाटत असतो. त्या प्रतिसादात निरागसतेचा सुगंध असतो. जाणीवपूर्वक तयार केलेल्या प्रतिसादात पूर्वग्रहांचे किल्मिष मिसळत जाते. त्याचा लोभसपणा उणावत जातो. कित्येकदा तर तो पुरेसा स्वीकारार्हही राहत नाही.

'सूर नवा, ध्यास नवा' कार्यक्रमात परवा लक्ष्मीकांत-प्यारेलाल जोडीतील प्यारेलालजी आलेले होते. ज्यांनी ज्यांनी तो कार्यक्रम पाहिला, ते नक्कीच सांगू शकतील की, तासाभराच्या छोट्याशा अवधीच्या त्या कार्यक्रमात प्यारेलालजी किमान दहा वेळा तरी उत्स्फूर्ततेने उभे राहिले होते. कार्यक्रमातील छोटे सूरवीर, त्यांचे मार्गदर्शक, भारतातील इतर समकालीन संगीतकार, वादक इत्यादींच्या लक्षणीय कलाकारीच्या कौतुकाखातर, त्यांचे गुणवर्णन करण्यासाठी ते उभे राहत होते. तोंड भरून कौतुक करत होते. त्यांतील खासियत उलगडून सांगत होते. आपल्याला ह्या सगळ्याचा आस्वाद घेता येतो आहे, ह्या स्वतःच्या आनंदास अभिव्यक्त करत होते. त्यामुळे सर्व कार्यक्रमातील उपस्थितांना आणि आमच्यासारख्या दुरून दूरदर्शन करणाऱ्यांनाही अपार आनंद झाला. त्यांच्या सत्त्वर प्रतिसादांमुळे आमचा आनंद शतगुणित झाला.

सत्त्वर प्रतिसादाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. पण त्याकरता मुळात प्रतिसाद द्यावा लागतो. तशी जाणीव असावी लागते. कित्येकदा आपले कुणाशी तरी बोलणे होते. आपण म्हणतो 'मी तुला तो तपशील पाठवतो'. मग आपण कायप्पावर (व्हॉटस ॲप वर) तो तपशील पाठवतोही. मिळणाऱ्याला तो मिळतो. त्याचे काम भागते. मात्र तो तपशील आपल्याला मिळाला आहे हे कळवण्याची त्याला आवश्यकताच वाटत नसते. त्यामुळे प्रतिसाद दिला जात नाही. हे युग माहितीचे आहे. म्हणूनच माहितीच्या देवाण-घेवाणाचे अलिखित संकेतही निर्माण झालेले आहेत. त्याचाच हा भाग आहे. मिळाल्याची पोच देणे, पावल्याची दखल देणे आणि कुणीही साद दिली तर प्रतिसाद देणे हे हल्ली सहज शक्य असते. प्रतिसाद दिल्याने जीवनातील समाधान वाढते. जगण्याची गुणवत्ता सुधारते. सत्त्वर प्रतिसाद दिल्याने तर दुधात साखरच पडते.

मनुष्य समाजशील प्राणी आहे. म्हणूनच समाजात त्याने कसे वागावे ह्याबाबत समाज वेळोवेळी मूल्ये निर्धारित करत असतो. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा ध्यान आणि समाधी ही अष्टांग योगाची सर्वही अष्टांगे, सामाजिक मूल्यांचाच हिस्सा राहिली आहेत. मात्र बदलत्या काळात मूल्यांमध्येही मोलाची भर पडत गेलेली दिसून येते. संपर्काची साधने सशक्त झाल्याने आजमितीस अवनीतलावरील कोणत्याही ठिकाणी, दिवस वा रात्रीचे कोणत्याही प्रहरी, कोणताही माणूस, इतर कोणत्याही माणसाशी सहजच तत्काळ संपर्क साधू शकतो. मात्र त्यास सत्त्वर प्रतिसाद लाभला नाही तर, साद देणाऱ्याचा हिरमोड होतो. प्रतिसाद मुळीच लाभला नाही तर निराशा येते. म्हणूनच, सत्त्वर

प्रतिसादाची निकड हेही एक नवीनच मूल्य हल्ली प्रस्थापित झालेले आहे.

त्यामुळे प्रतिसाद, प्राप्त करणाऱ्यास समाधानकारक असो वा नसो, प्रतिसाद अवश्य द्यावा. तशी सवयच अंगी बाणवून घ्यावी हे बरे.

अलीकडच्या काळातच काही लोक हरिश्चंद्रगडावर पदभ्रमणाकरता गेले होते. अशा ठिकाणी रस्ते काही आखीव-रेखीव नसतात. एकसारख्या निसर्गसंगतीमुळे ते चटकन ओळखूही येत नाहीत. कित्येकदा तर आपण कोणत्या दिशेस कूच करत आहोत हेच लक्षात येईनासे होते. नुकताच पावसाळा होऊन गेलेला असेल तर हिरवळ, झाडीझुडुपे ह्यांनी रस्ता झाकूनच गेलेला असतो. डोंगरवाटा म्हणजे काही राजरस्ता नव्हे. कुठे पाऊलवाट दिसत असते, कुठे ढोरवाटा दिसत असतात, कुठे बैलगाड्यांच्या चाकांचे रपटे असतात, कुठे पुरुष पुरुष उंचीच्या गवतातून वाटच हरपलेली दिसत असते. त्यामुळे त्यातील काही लोक वाट चुकले. जिथे पोहोचले होते तिथून चारही बाजूंना तुटके कडे दिसू लागले. पुढे जाता येईना आणि मागेही जाता येईना. हाका मारूनही त्यांच्या साथीदारांना ऐकू येईना. मग त्यांनी कसातरी, फोनवर, जिल्हाधिकारी कार्यालयातील कुणाशीतरी संपर्क साधला. ज्या व्यक्तीशी संपर्क साधला, तिने तत्परतेने त्याची दखल घेतली. जिल्हाधिकाऱ्यांना ती माहिती दिली. त्यांनी तडफेने काही पट्टीच्या गिर्यारोहकांशी संपर्क साधला. त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. साधलेल्या संपर्कातून त्यांच्या स्थानाची निश्चिती करण्यात आली. गिर्यारोहकांना जवळातजवळ जागी पोहोचविण्यात आले. त्यांनी तिथवर मार्ग काढून, गिर्यारोहण साधनांच्या साहाय्याने त्या लोकांची सुटकाही केली. आम्ही दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात ते वृत्त सविस्तर वाचले. मात्र इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, त्यांनी ज्याला ज्याला साद दिली, त्या त्या प्रत्येकाने सकारात्मक प्रतिसाद, सत्त्वर दिला म्हणूनच त्यांची सोडवणूक होऊ शकली होती. त्यामुळे -

**काय नुसते संवेदता, प्रतिसाद द्या ।**
**साद कोणीही दिली तर दाद द्या ॥**

**आंधळ्यांची दिव्य दृष्टी व्हा तुम्ही ।**
**अन्मुक्यांना नेमके संवाद द्या ॥**

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत अशी सर्वांनाच कळकळीची विनंती.**

**- संपादक**

एखाद्याचे अनुकरण करणे हीच त्याची खरीखुरी केलेली खुशामत होय. - बॅरी पॉन

# मुक्ती व वेड

*पंढरपूरचा पांडुरंग हा अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत. त्याच्या भेटीसाठी वारकरी हजारो मैल दूर चालत जातात. मुक्ती व वेड या शीर्षकाखाली सौ. भाग्यश्री दत्तात्रय कुलकर्णी यांनी लिहिलेली दोन छोटी लघुकथारूप टिपणं प्रस्तुत लेखात देत आहोत - संपादक*

**मुक्ती**

**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या**

'महाराज मला या दुःखरूप संसारातून मुक्त व्हायचंय. परत जन्म, मरण नको.' पतीच्या अकाली निधनाने दुःखी झालेल्या कौसल्याबाई बोलल्या.

'हो. पण त्यासाठी तुम्ही नामस्मरण वाढवा. सगळ्या ग्रंथावरची प्रवचने ऐकत फिरलात तर मनातला गोंधळ वाढेल'. वासुदेव महाराज म्हणाले.

वासुदेव महाराज आमच्याबरोबर चातुर्मासासाठी पंढरपुरला आलेले महात्मा. व्यासंग दांडगा. दृढ गुरूभक्ती आणि सगळ्यांना सामावून घेण्याची तळमळ. त्या तळमळीतूनच पांडुरंग मंदिरात झालेला कालचा हा ज्ञान-संवाद.

नित्याप्रमाणे सकाळी नगरप्रदक्षिणेला निघालो. पाय सवयीने चालत होते. पण मनात मात्र विचारांचं आवर्त चालू होतं. खरंच मुक्ती असते?

ब्रह्म : परब्रह्मलिंग् भजे पांडुरंग् असं शंकराचार्यांनी गौरविलेलं विटेवरचं दृश्य ब्रह्म.

परी तयापाशी पांडवा। मी हारपला गिंवसावा। ज्याला नामरूप नाही असं वेद म्हणतात, पण जिथं माझा नामघोष चालतो तिथंच मी असतो असं गीतेत बोलणारं शब्द ब्रह्म.

**आता जग मिथ्या :**

ही खळखळ वाहणारी चंद्रभागा, तळपणारा सूर्य, तिच्यात स्नान करणारे भाविक आणि ज्यांनी आपल्या भक्ती सामर्थ्यावर निराकार ब्रह्माला अठ्ठावीस युगे विटेवर उभं ठेवलं ते पुंडलिकराय खोटे? मग खरं काय?

विचारांच्या तंद्रीत मंदिरात पोहोचले आणि.... आणि समोर साक्षात मुक्ती स्वागताला उभी. देहभान हरपलं. खालची चंद्रभागा दोन्ही डोळ्यांतून पाझरू लागली. आनंद, आनंद, आनंद.

सुंदर ते ध्यान असा पांडुरंग समोर उभा. प्रत्यक्ष देव, शास्त्रे वाटावित असे वारकरी आणि अखंड चालणारा रामकृष्ण हरीचा गजर.

मला वाटत होतं, माझ्याकडे बघून तो म्हणतोय, 'अगं हीच ती मुक्ती; आणि मनाने परत एकदा दृढ निश्चय केला, जग मिथ्या नाही, तो तर त्याचा खेळ, त्याची लीला. आपण या खेळात आनंदाने सहभागी व्हायचं. प्रत्येक क्षण समरसून जगायचं. माझ्या मते मुक्ती ही मिळवण्याची नाही तर अनुभवण्याची गोष्ट आहे.

तसं पाहिलं तर या जगात सर्वश्रेष्ठ भक्ताचा दर्जा कुणाही विरक्ताला, कुणाही योग्याला दिला जात नाही. तो दिला जातो नंदगोपसुतं देवं पती मे कुरुं तं नमः असं म्हणणाऱ्या गोपिकांना. कबीर महाराज म्हणतात - एक एक गोपीके प्यार में बह गए लाखो कबीर.

संत जनाबाईच्या निर्जीव गोवऱ्या 'विठ्ठल विठ्ठल' म्हणतात! चोखेबा रायांची हाडे 'विठ्ठल विठ्ठल' बोलतात!

---

अनुकरण करून कोणीही महत्पदाला चढलेला नाही. - एस. जॉन्सन

आणि इतकी श्रेष्ठ संतमंडळी ज्या जगात आहेत ते जग मिथ्या कसं असेल.

हं, एक आहे. जगात रहाताना आपलं ध्येय काय असावं? आणि कुठं किती गुंतावं याचा मात्र विचार असावा. त्याच्यासाठीही या जगात ज्येष्ठ आणि श्रेष्ठ मार्गदर्शक आहेतच.

**मग तुका म्हणे मुक्ती परिणिली नोवरी**
**आता दिस चारी खेळीमेळी**

**वेड**

काय आजी किती तास झाले लाईनीत लागुन? तासाचं माहीत नाही. पण रात्री दोनला लागले होते. आजी म्हणाल्या.

अहो, आजी मग एवढ्या वेळात काही तहानभूक वगैरे (शरीरधर्म). अवो, पांडुरंगाच्या दर्शनापुढे कसली तहानभूक न कसलं काय. डोळ्यांपुढं फक्त तोच दिसत असतो. मग काय लाईनीत सरकत रहायचं.

कार्तिक शुद्ध एकादशी, दुपारचे बारा वाजले होते. आजींना दर्शनासाठी अजून एखादा तास तरी नक्कीच लागणार होता. पण आजी आनंदाने टाळ्या पिटीत भजनं म्हणत होत्या. (वय वर्षे ७५).

खरंच कुठुन येतं एवढं बळ? एरवी तथाकथित सुशिक्षित समाजाचं आठ वाजले की, 'अहो थोडं खाऊन घ्या. गोळी घ्यायचीय ना' म्हणत तब्येतीचा उदो उदो करणारे आपण पंढरपूरला गेलो की चक्रावून जातो.

किस चक्की का आटा खाते होंगे ये लोग?

या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी पंढरपुरात मुक्काम ठोकावा लागतो. तिथं चंद्रभागेतल्या वाळवंटातून गावातल्या खड्ड्याखड्ड्यांच्या रस्त्यावरून अनवाणी चालणाऱ्या वारकऱ्यांशी संवाद साधावा लागतो. सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे त्यांच्या दृष्टीनं आणि श्रद्धेने या सगळ्याकडे बघावं लागते. आणि मग उलगडत जात एक गोड कोडं. देवभक्तांचं आपापसात असणारं एक खुळावणारं, बेभान करणारं वेड.

इथं माउली म्हणतात,

**आधारशक्तीचिया अंकी। वाढविसी कौतुकी।**
**हृदयाकाशपल्लकीं। परिये देसी निजे।।१।।**
**सतरावियेचे स्तन्य देसी। अनुस्ताचा अल्लरु गायी।**
**समाधिबोधे निविसी। बुझाडुनी।।२।।**

एकनाथ महाराज म्हणतात,

**अवघेचि त्रैलोक्य आनंदाचे आता।**
**चरणी जगन्नाथा चित्त केले।**
**माय जगन्नाथ, बाप जगन्नाथ। अनाथाचा नाथ जनार्दन.**

जगद्गुरू तुकाराम म्हणतात,

**आनंदाचे डोही। आनंद तरंग। आनंदाचि अंग आनंदचि।**

खरंच पंढरपूरचं सगळंच विलक्षण आहे. अतर्क्य आहे. इथ देवाला आषाढीला पंधरा दिवस व कार्तिकीला पंधरा दिवस शेजारती नसते. फक्त सकाळी पूजा. बाकीचे उपचार नसतात. एकदाच जेवण, आधारासाठी मागे एक लोड ठेवलेला असतो व थकवा घालवण्यासाठी दोनदा लिंबुपाणी देतात.

**तो पहावा हे डोहाळे। म्हणोनि अचक्षुसी मज डोळे।**
**हातींचेनि लीलाकमळे। पुजुं तयाते।।१।।**
**दोवरी दोनी। भुजा आलो घेउनि।**
**आलिंगावयालागुनि। तयाचे अंग।।२।।**

हे आपले वचन सार्थ करण्यासाठी भगवंत अष्टौप्रहर भक्तांना दर्शन देण्यासाठी उभाच असतो.

(पृष्ठ क्र.३८वर)

आपल्या हृदयात काही तरी 'अक्षय' असे आहे हे जाणणे, हाच खरा परमानंद आहे! - वर्डस्वर्थ

# राष्ट्रीय दिनदर्शिका आणि पारंपरिक पंचांग

*राष्ट्रीय दिनदर्शिका आणि पारंपरिक पंचांग या दोन्ही दिनदर्शिकांबद्दल माहिती या लेखात करून देण्यात आली आहे- संपादक*

राष्ट्रीय दिनदर्शिकेत दिनांक असतो आणि पारंपारिक पंचांगात तिथी, वार, नक्षत्र, योग, करण अशी पाच अंगे असतात म्हणून त्याला पंचांग म्हटले जाते. या दोन्ही दिनदर्शिकांबद्दल आपण माहिती करून घेऊ.

शालिवाहन शक गणनेच्या पारंपरिक पंचांगात वर्ष निरयन सौर असते आणि महिने चांद्र असतात. महाराष्ट्रासह दक्षिण भारतात चांद्र महिने अमांत म्हणजे शुद्ध प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत धरले जातात. ज्या महिन्यात रविचे निरयन मेष संक्रमण होते आणि पौर्णिमा, चंद्र चित्र नक्षत्राजवळ असताना होते त्याला चित्रा नक्षत्रावरून चैत्र असे नाव दिले जाते. पुढे अनुक्रमे वृषभ, मिथुन वगैरे संक्रमणे ज्या ज्या चांद्र महिन्यात होतात व पौर्णिमा अनुक्रमे विशाखा, ज्येष्ठा ह्या नक्षत्रांजवळ चंद्र असताना होतात त्यांना वैशाख, ज्येष्ठ, आषाढ वगैरे नावे दिली जातात. ह्या गणनेची सुरुवात शालिवाहनापासून म्हणजे इ.स. ७८/७९ पासून सुरू झाली. सूक्ष्म चांद्र महिना आणि सूर्याला एक रास ओलांडण्यास लागणारा काळ ह्याच्या काटेकोर स्थितीप्रमाणे एखाद्या चांद्र महिन्यात संक्रमण मुळीच होत नाही. तो अधिक महिना धरून त्याला पुढील महिन्याचे नाव देतात. ह्या उलट ज्या चांद्र महिन्यात दोन संक्रमणे होतात त्याला क्षय मास म्हणतात व त्या महिन्यास पुढील महिना क्षय व चालू महिना असे जोड नाव देतात. असे आपल्या पारंपरिक पंचांगाचे स्वरूप आहे. ही पद्धत इ.स. पूर्व ४/५ वे शतक ते इ.स. नंतर ४/५ शतक ह्या कालखंडात प्रस्थापित झाली. परंतु त्या आधी प्राचीन वैदिक काळी वर्ष हे ऋतुंशी निगडित आणि महिन्यांची नावे मधू, माधव, शुक्र, शुची वगैरे ऋतू दर्शक होती.

आता राष्ट्रीय दिनदर्शिकेकडे वळू या. संपूर्ण भारतातील पंचांगात एकवाक्यता आणण्याकरिता १९५७ साली श्री. मेघनाथ साहा ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक पंचांग शोधन समिती नेमली होती. अनेक मान्यवर ज्योतिर्विद ह्या समितीचे सदस्य होते. त्यांनी ज्या दिनदर्शिकेची रचना केली व ज्याला शासनाने मान्यता दिली ती आपली राष्ट्रीय दिनदर्शिका. त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे. ह्या समितीने ग्रेगरियन सायन सौर वर्षमान प्रमाण मानून १२ महिन्यांना चैत्र, वैशाख, जेष्ठ अशी परंपरागत नावे दिली. ह्यात वर्षाचे दिवस ग्रेगरियन वर्षाप्रमाणेच ३६५ आणि लीप वर्षात ३६६ आहेत. चैत्र महिन्याची सुरुवात २२ मार्च रोजी होते आणि त्याचे दिवस ३० असतात आणि लीप वर्षात चैत्राची सुरुवात २१ मार्च रोजी होऊन चैत्र महिन्याचे दिवस ३१ असतात. १९५७ साली असलेले १८७९ हेच शक वर्ष धरून पुढील वर्षांची गणना करण्यास सुरुवात केली. लीप वर्षाकरता पुढील नियम बनवला. शक वर्षात ७८ मिळवून येणाऱ्या संख्येस ४ ने व शतक संख्येस ४०० ने भाग गेल्यास ते लीप वर्ष धरावे. म्हणजे तत्त्वतः जे ग्रेगरियन वर्ष लीप असते. त्या वर्षी सुरू होणारे राष्ट्रीय शक वर्षही लीप असते. वैशाख ते भाद्रपद ह्या महिन्यांचे दिवस ३१ आणि अश्विन ते फाल्गुन ह्या महिन्यांचे दिवस ३० असतात. ह्यामध्ये

सूर्याची अंशात्मक भासमान भ्रमणगती जेव्हा सरासरीपेक्षा कमी असते म्हणजे सूर्याला ३० अंश ओलांडण्याला जास्त वेळ लागतो. ते महिने ३१ दिवसांचे व जेव्हा ही गती जास्त असते म्हणजे ३० अंश ओलांडण्याला कमी वेळ लागतो. ते महिने ३० दिवसांचे अशी योजना आहे. २१ एप्रिल पासून पुढील वर्षाच्या २८ फेब्रुवारी पर्यंतच्या सर्व तारखा विशिष्ट राष्ट्रीय दिनांकाशी निगडित असतात. फक्त लीप वर्षात २९ फेब्रुवारी येत असल्याने राष्ट्रीय तारखा १ दिवसाने मागे सरकून व चैत्र महिन्याचे ३१ दिवस असल्यामुळे २१ एप्रिल रोजी पुन्हा १ वैशाख येऊन ग्रेगरियन व राष्ट्रीय वर्षांच्या तारखा जुळून येतात.

आपण सर्वजण अधिकृत सरकारी प्रसार माध्यमांमध्ये, उदाहरणार्थ आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्रे ह्यामध्ये हा उल्लेख पाहत असतो. भारतीय सौर दिनांक अमुक शक अमुक असा राष्ट्रीय दिनदर्शिकेतील दिवस सांगितला जातो. वास्तविक पारंपरिक पंचांग हे सौरच आहे. फक्त ते निरीयन सौर आहे आणि दिनदर्शिका ग्रेगरियन कॅलेंडर प्रमाणे सायन सौर आहे इतकेच. शासनाने ह्या दिनदर्शिकेस अधिकृत मान्यता दिली असून सर्व देशांतर्गत व्यवहारात आपण हा दिनांक वापरू शकतो. उदाहरणार्थ चेक वरील तारीख, अधिकृत सरकारी कागदपत्रांवरील तारीख इत्यादी.

अभिनिवेश म्हणून राष्ट्रीय दिनदर्शिका वापरणे सुखदायी असले तरी ह्याचा व्यापक आग्रह धरण्यात खालील मुद्दे गैरसोईचे ठरू शकतात.

१) ह्या दिनदर्शिकेला आंतरराष्ट्रीय स्वीकृत मिळण्याची शक्यता जवळजवळ नाही. भारताच्या देशांतर्गत व्यवहारातच ह्या दिनदर्शिकेच्या वापराची मर्यादा रहाणार.

२) उत्तर गोलार्धाच्या वसंत संपाताच्या दिवशी म्हणजे २१ किंवा २२ मार्च ह्या दिवशी ह्या वर्षाची सुरुवात होते हे खरे आहे. परंतु स्थानिक पातळीवरील व्यवहारांनी आता जागतिक व्यापक स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे प्राचीन काळाप्रमाणे शेतीशी निगडित आणि स्थानिक गरज म्हणून ऋतूंप्रमाणे वर्ष सुरू होण्याची तितकीशी आवश्यकता राहिलेली नाही. आणि जगभरातील वेगवेगळ्या प्रदेशात सर्वत्र कोणताही ऋतू एकाच काळात सुरू होत नसतो. म्हणजे २१ मार्च हा जागतिक वसंत संपात नसून फक्त उत्तर गोलार्धाचा आहे. परंतु ग्रेगरीयन वर्षाचा १ जानेवारी हा आरंभ दिवस. पृथ्वी आपल्या कक्षेत भ्रमण करतांना उपसूर्य बिंदूवर येते त्या ३ जानेवारीच्या अगदी निकट आहे. आणि हा दिवस जगभराकरता एकच म्हणजे जागतिक आहे. अर्थात उपसूर्य बिंदुला तारकासापेक्ष पूर्वेकडे १२'' गती असल्याने ह्या बिंदुशी निगडित परिक्रम वर्ष सायन आणि निरयन दोन्ही वर्षांपेक्षा मोठे आहे.

३) वास्तविक आर्तव वर्षापेक्षा ग्रेगरियन वर्ष २६ सेकंदांनी मोठे असल्याने ३३३३ वर्षात १ दिवस जास्त धरला जातो. इराणी नवरोजनामा हे वर्ष ग्रेगरीयन वर्षापेक्षा जास्त सूक्ष्म आहे. वास्तविक आर्तव वर्षापेक्षा हे १८ सेकंदांनी मोठे आहे. त्यामुळे ५००० वर्षांत १ दिवस जास्त धरला जातो.

४) शिवाय सर्व धार्मिक बाबी आपण निरयन सौर आणि ऋतुंशी निगडित नसलेल्या पारंपरिक पंचांगाप्रमाणेच करत असतो. आणि दुसरी बाब म्हणजे ह्या समितीने चैत्र, वैशाख ही पारंपरिक निरयन सौर वर्षातील महिन्यांचीच नावे स्वीकारली. ही नावे पूर्णपणे नक्षत्र अन्वयार्थक म्हणजेच निरयन सौर आहेत. ही ऋतूंशी बिलकुल निगडित नाहीत. संपात बिंदुना वर्षाला ५०.२'' एवढी पश्चिमेस गती आहे. त्यामुळे निरयन वर्ष सायन वर्षापेक्षा २० मिनिटांनी मोठे आहे याचा परिणाम म्हणून निरयन सौर वर्षातील दिवस, सौर नक्षत्र, महिना इत्यादी

(पृष्ठ क्र.३८वर)

# १९ व्या शतकातील पश्चिम भारतातील आद्यऋषी : बाळशास्त्री जांभेकर

## भाग : १

*१९ व्या शतकातील आद्य समाजसुधारक व पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्याविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील व पश्चिम भारतातील १९ व्या शतकातील आद्य समाजसुधारक होत. त्यांनी महाराष्ट्रात १९ व्या शतकात प्रबोधनाची खऱ्या अर्थाने सुरुवात केली. त्यांनी केलेल्या कार्याच्या पायावरच १९ व्या शतकातील सामाजिक, शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील सुधारणा होऊ शकली व त्यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रात विद्वान-विचारवंतांची व समाज सुधारकांची फळी निर्माण झाली यात वाद नाही. बाळशास्त्रींच्या उत्तुंग कार्याची ओळख आजच्या पिढीला थोडक्यात करून देण्यासाठी हा प्रस्तुत लेख लिहिण्याचा प्रयत्न करत आहोत. आजच्या पिढीला बाळशास्त्रींनी केलेल्या विविध क्षेत्रांतील कामगिरींमधून निश्चितच प्रेरणा मिळेल यात शंका नाही.

बाळशास्त्री जांभेकरांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. असे म्हटले जाते की, त्यांनी वयाच्या साधारणतः सोळाव्या वर्षी त्यांनी लिखाण करण्यास सुरुवात केली. बाळशास्त्रींनी 'नीतीकथा', 'सारसंग्रह', 'इंग्लंड देशाची खबर' इत्यादी पुस्तके मराठी भाषेत खूप तरुण वयात लिहिली होती. बाळशास्त्रींनी 'शून्यलब्धी व मूल परिणती गणित' हा ग्रंथ १८४१ साली लिहिला होता. बाळशास्त्रींचा गणित या विषयावर विशेष हातखंडा होता. त्यांनी कुलाबा वेधशाळेच्या संचालक पदाची देखील जबाबदारी सांभाळली होती. अध्यापक वर्गाचे संचालक असताना बाळशास्त्री विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या म्हणजेच 'मे' महिन्याच्या सुट्टीत कान्हेरी लेण्यांकडे सहलीला घेऊन जात असत. ही सहल म्हणजे विद्यार्थ्यांची अभ्यास सहल असे. बाळशास्त्री विद्यार्थ्यांना तेथे लेण्यांच्या इतिहासाविषयी माहिती देत असत. तसेच त्यांना निसर्ग-निरीक्षण कसे करावे हे सांगत वा शिकवत असत. त्याचप्रमाणे रात्रीच्यावेळी ते विद्यार्थ्यांकडून आकाशदर्शन करून घेऊन त्यांना विविध ग्रह, तारे व एकंदरीतच आकाश मंडलाची माहिती देत असत. अभ्यासकांचे मत आहे की, ते ज्योतिषशास्त्र विशारद होते. त्यांनी त्यांच्या 'दिग्दर्शन' मासिकात ज्योतिषशास्त्रावर लेख लिहिले असल्याचे आपल्या निदर्शनास येते. बाळशास्त्रींनी भूगोल या विषयावर 'भूगोलविद्या' व 'भूगोलशास्त्र-गणित भाग १' ही पुस्तके लिहिली होती. बाळशास्त्रींनी मराठी भाषेच्या व्याकरणावरील 'बाल व्याकरण' हे पुस्तक देखील लिहिले होते.

१८४० मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी 'दिग्दर्शन' हे पहिले मराठी मासिक सुरू केले. 'दिग्दर्शन' या शीर्षकावरून आपणास लक्षात येते की, बाळशास्त्रींना या मासिकाच्या माध्यमातून समाजाला योग्य ती दिशा देण्यासाठी मार्गदर्शन व दिग्दर्शन करावयाचे होते. 'दिग्दर्शन' मासिकात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल, इतिहास इत्यादी विषयांवर आधारीत लेख छापले जात असत. येथे एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे, व ती ही की, बाळशास्त्री हे भाषाप्रभू होते. त्यांना मराठी, संस्कृत, इंग्रजी, हिंदी, ग्रीक, लॅटीन, फ्रेंच, गुजराती, बंगाली इत्यादी भाषा अवगत होत्या. बाळशास्त्रींनी अनेक शोधनिबंध लिहिलेले होते. त्यांनी 'ज्ञानेश्वरी'ची पहिली छापील प्रत काढली होती अशी माहिती आपणास मिळते.

उलटा केलेला पिरॅमीड कधीच उभा राहू शकत नाही! - यंग

बाळशास्त्री हे वेदविद्याशास्त्रात निपूण होते. याचाच अर्थ असा की, ते वेदशास्त्री होते. बाळशास्त्रींचा जन्म सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या तालुक्यातील पोंभुर्ले या गावी झाला. सध्या पोंभुर्ले गावात बाळशास्त्रींचे वंशज राहतात. याच गावात त्यांच्या वंशजांनी बाळशास्त्रींची समाधी बांधली आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्रत्येक वर्षी ६ जानेवारी या दिवशी पत्रकार मंडळी पोंभुर्ल्याला येऊन बाळशास्त्रींच्या समाधीला भेट देत असतात. बाळशास्त्रींच्या जन्म तारखेविषयी संशोधकांमध्ये एकमत आढळत नाही. काही अभ्यासकांच्या मते बाळशास्त्रींचा जन्म २० फेब्रुवारी १८१२ साली झाला असावा. बाळशास्त्रींचा जन्मदिवस २० फेब्रुवारी असावा असे म्हणणाऱ्यांमध्ये प्रसिद्ध पत्रकार माधव कदम यांचाही समावेश होतो. ६ जानेवारी १८१२ हीच बाळशास्त्रींची जन्मतारीख असल्याचा एक मतप्रवाह आहे.

बाळशास्त्रींच्या वडिलांचे नाव गंगाधरशास्त्री असे होते. त्यांचे घराणे मूळचे सध्याच्या सातारा जिल्ह्यातील कऱ्हाडचे. जांभेकर ऋग्वेदी, कौशिकगोत्री कऱ्हाडे ब्राह्मण होते. यांचे पूर्वज कऱ्हाडच्या आसपासच्या प्रदेशांमध्ये राहत असत म्हणून हे लोक 'कऱ्हाडे ब्राह्मण' म्हणून ओळखले जाऊ लागले. कोकणात राज्य करणाऱ्या शिलाहार या राजघराण्याच्या काळात बाळशास्त्रींचे व एकंदरीतच कऱ्हाडे ब्राह्मणांचे पूर्वज इसवी सनाच्या १० व्या शतकात कोकणात आले. जांभेकर मंडळी कोकणात आल्यावर गोमंतक (गोवा) तसेच कोकणातील इतर प्रदेशांत विखुरले गेले तरी त्यांचे कोकणातील मूळस्थान सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्याचा परिसर होता असे म्हटले जाते. बाळशास्त्रींचे पूर्वज मात्र गेल्या पाचशे वर्षांच्या कालावधीपासून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभुर्ले या गावी राहत असल्याचे संशोधकांचं मत आहे. बाळशास्त्रींच्या आईचे नाव सगुणाबाई होते. गंगाधरशास्त्री व सगुणाबाईंना एकूण चार अपत्ये होती. यापैकी दोन पुत्र तर दोन कन्या होत्या व त्यांची नावे पुढीलप्रमाणे होती – नारायणशास्त्री (ज्येष्ठ पुत्र), लाडूबाई, चिमाबाई व बाळशास्त्री. या जांभेकर कुटुंबांतील सर्वात कनिष्ठ पुत्र म्हणजे बाळशास्त्री होत. बाळशास्त्रींची बहीण लाडूबाई हिचा विवाह रामशास्त्री जानवेकर ह्यांच्याशी झाला होता व त्यांच्याचमुळे बाळशास्त्री मुंबईला आले होते. गंगाधरशास्त्रींना त्यांचे ज्येष्ठ पुत्र नारायणशास्त्री व दोन कन्या लाडूबाई तसेच चिमाबाई यांचे निधन पाहण्याचे दुःख नशिबी आले. गंगाधरशास्त्रींचे निधन १८४० साली पोंभुर्ले गावात झाले. बाळशास्त्रींचा विवाह लहानपणीच झाला व त्यांच्या ह्या पहिल्या पत्नीचे निधन १८३३ साली झाले. तिने एका मुलाला देखील जन्म दिला होता. हा मुलगा देखील अतिशय लहानपणीच म्हणजेच साधारणतः सहा ते सात वर्षांचा असताना वारला. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर बाळशास्त्रींचा विवाह चिमाताई हिच्यासोबत झाला. ही चिमाताई सदाशिव कृष्ण देवस्थळी यांची कन्या होती. लग्नानंतरचे तिचे सासरचे नाव 'सुंदराबाई' असे ठेवलेले होते. बाळशास्त्रींना वयाच्या ३४ व्या वर्षी १८४६ साली काळाने ओढून नेले, तर सुंदराबाईंचे १८४७ साली देहावसान झाले व १८४८ ला त्यांच्या लहान मुलाचे देखील निधन झाले. बाळशास्त्रींचे निधन झाले तेव्हा सुंदराबाई गरोदर होत्या.

आपणास काही चरित्रकारांनी दिलेल्या माहितीवरून बाळशास्त्रींचे वर्णन मिळते. असे म्हणतात की, बाळशास्त्रींची उंची मध्यम होती व ते काहीसे ठेंगणे वाटत. ते साधारणतः सावळे होते, तसेच त्यांचे डोळे मोठे होते. बाळशास्त्री डोक्यावर पुणेरी पगडी घालत असत व धोतर नेसत असत असे जाणकरांचे मत आहे.

१८२५ च्या अखेरीस बाळशास्त्री कोकणातून मुंबईत आले असे अभ्यासक मानतात. प्रार्थना समाजाची स्थापना करणाऱ्या दादोबा पांडुरंग तरखडकर यांचे बाळशास्त्री हे गुरू होत. बाळशास्त्रींचे विद्यार्थी–

दशेपासूनच इंग्रजी भाषेवर तर प्रभुत्व होतेच त्याचप्रमाणे त्यांना गणित या विषयातही गती होती. त्यामुळे विद्यार्थी असतानाच बाळशास्त्री गणित हा विषय शिकवत असत. बाळशास्त्र्यांना इंग्रजी, मराठी व संस्कृत व्यक्तिरिक्त गुजराती, बंगाली, फारसी, कन्नड, हिंदी, उर्दू आदी भाषांचे ज्ञान होते. बाळशास्त्रींना आपल्या वयाच्या विशीतच 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' या संस्थेचा 'नेटिव्ह सेक्रेटरी' बनण्याचा मान मिळाला होता. या पदावर साधारणतः मान्यता पावलेल्या व श्रीमंत पारसी, मुस्लिम वा हिंदू व्यक्तींची वर्णी लागत असे. त्यामुळे अगदी तरुण वयात बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटींचे 'नेटिव्ह सेक्रेटरी' होणाऱ्या बाळशास्त्रींचे कर्तृत्व लक्षात येते.

जानेवारी १८३३ ते नोव्हेंबर १८३४ या कालावधीत बाळशास्त्री अक्कलकोटला होते. तेथे ब्रिटिशांनी त्यांच्यावर अक्कलकोटचे युवराज शहाजी भोसले यांच्या शिक्षणाची जबाबदारी टाकली होती. १८३३ मध्येच त्यांच्या प्रथम पत्नीचे निधन झाले व त्यानंतर त्यांचा चिमाताई म्हणजेच सुंदराबाईंशी विवाह झाला. अक्कलकोटला असतानाच बाळशास्त्री भजन व ज्ञानेश्वरी पठणाकडे वळले अशी माहिती आपणास अभ्यासक देतात. याचा अर्थ बाळशास्त्रींचा ज्ञानेश्वरीवरचा अभ्यास व व्यासंग होता. १८४५ साली बाळशास्त्रींनी ज्ञानेश्वरीची मराठीतील पहिली प्रत मुद्रित केली असे संशोधक म्हणतात. नोव्हेंबर १८३४ मध्ये बाळशास्त्री मुंबईतील एलफिन्स्टन महाविद्यालयात 'असिस्टंट प्रोफेसर' या पदावर रुजू झाले. बाळशास्त्रींनी पाश्चात्य गणित व ज्योतिषशास्त्राचा देखील सखोल अभ्यास केला होता. बाळशास्त्रींनी काहीकाळ एलफिन्स्टन महाविद्यालयात 'ॲक्टिंग प्रोफेसर' पदाचीसुद्धा जबाबदारी सांभाळली होती. तसेच त्यांनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणून देखील काम केले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे 'पितामह' दादाभाई नौरोजी हे देखील बाळशास्त्रींचे शिष्य होते. एलफिन्स्टन महाविद्यालयात नोकरी करत असताना बाळशास्त्रींना शाळा तपासनीस म्हणून देखील काम करावे लागत असे व त्यांनी कोकणातील अनेक शाळा तपासल्याचे निदर्शनास येते. ग्रामीण भागातील शाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने त्यांनी ब्रिटिश शासनाला निवासी शाळा काढण्याची सुचना केली होती व सरकारनेदेखील ती मान्य केली होती असे आपल्या निदर्शनास येते.

नीला उपाध्ये यांनी आपल्या 'युगप्रवर्तक बाळशास्त्री जांभेकर : काळ आणि कर्तृत्व' या पुस्तकात बाळशास्त्रींच्या लहानपणीचा एक अतिशय रोचक किस्सा सांगितला आहे. सदर किस्स्यावरून बाळशास्त्रींची स्मरणशक्ती किती दांडगी होती याची प्रचीती येते. हा किस्सा असा की, बारा-तेरा वर्षांचे बाळशास्त्री एकदा मुंबईत एका रस्त्याच्या कडेला उभे असताना दोन गोऱ्या शिपायांमध्ये भांडण होऊन मारामारी जुंपली. हे प्रकरण फौजदारी न्यायाधिशांपर्यंत पोहोचले व बाळशास्त्रींना या भांडणाचा साक्षीदार म्हणून न्यायाधिशांसमोर बोलाविले गेले. बाळशास्त्रींना तेव्हा इंग्रजी येत नव्हते. परंतु त्यांनी त्या दोन शिपयांमध्ये इंग्रजीत झालेला संवाद जसाच्या तसा आपल्या स्मरणात ठेवला होता व ते दोन शिपाई एकमेकांना काय बोलत होते ते बाळशास्त्रींनी न्यायाधिशांसमोर तंतोतंत जसेच्यातसे सांगितले. सदर न्यायमूर्ती तर बाळशास्त्रींची स्मरणशक्ती पाहून अक्षरशः अवाक् झाले. इंग्रजी येत नसताना देखील या मुलाने इंग्रजीतील संवाद स्मरणात ठेवला याचे त्यांना फार आश्चर्य वाटले व त्या न्यायाधिशांनी बाळशास्त्रींना इंग्रजी शिकविण्यात यावे अशी शिफारस शिक्षण खात्याला केली. या प्रसंगावरून बाळशास्त्रींच्या असामान्य बुद्धीमत्तेची व स्मरणशक्तीची झलक आपणास पहावयास मिळते.

बाळशास्त्रींना आपल्या वृत्तपत्रांमध्ये समाजाचे प्रतिबिंब उमटवायचे होते. तसेच त्यांना समाजाला विविध विषयांबाबतीत जागरूक करावयाचे होते. बाळशास्त्रींच्या लक्षात आले होते की, १९ व्या शतकात समाजामध्ये

जो विचाराचा अतिरेक करतो, त्याच्या हातून विशेष काही घडत नाही. - स्किलर

अनेक वाईट प्रवृत्तींचे आक्रमण झाले आहे व त्यामुळे समाज अनेक पातळ्यांवर पिछाडीवर पडलेला आहे. त्यातून समाजाला बाहेर काढावयाचे असल्यास समाजाचे प्रबोधन होणे व ज्ञानाचा प्रसार होणे आवश्यक असल्याचे बाळशास्त्रींनी ताडले. त्यामुळेच बाळशास्त्रींनी समाज प्रबोधन करावयाच्या उदात्त हेतूने १८३२ साली 'दर्पण' या पत्राची सुरुवात केली. हे पत्र इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांमध्ये निघत असे. या पाक्षिकाचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ साली निघाला. ६ जानेवारी हा बाळशास्त्रींचा जन्मदिन देखील होता. 'दर्पण' हे पत्र जेव्हा सुरू झाले तेव्हा बाळशास्त्रींचे वय अवघे वीस वर्षांचे होते. यावरून बाळशास्त्रींच्या असामान्य बुद्धिमत्तेची जाणीव होते. ज्याप्रमाणे ज्ञानेश्वर माउलींनी अवघ्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहून संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञानाच्या प्रकाशात उजळविण्याचे काम केले, त्याचप्रकारे बाळशास्त्रींनी वयाच्या विसाव्या वर्षी 'दर्पण' सुरू करून एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राला उपकृत केले असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. 'दर्पण' सुरुवातीस 'पाक्षिक' असले तरी नंतर ते साप्ताहिक झाले. २६ जून १८४० चा अंक हा दर्पणचा शेवटचा अंक ठरला.

आपण अगोदर उल्लेख केलाच की, बाळशास्त्रींना 'दर्पण'च्या माध्यमातून समाज प्रबोधन व समाज सुधारणा करावयाच्या होत्या. एकोणिसाव्या शतकात समाजामध्ये अनेक वाईट चालिरिती व रुढींचे थैमान माजले होते. अशीच एक वाईट गोष्ट म्हणजे त्याकाळातील विधवांची दयनीय सामाजिक स्थिती ही होय. त्याकाळात विधवांसमोर साधारणतः दोनच पर्याय असत. हे पर्याय म्हणजे एकतर त्यांनी 'सती' जावे व दुसरा पर्याय म्हणजे केशवपन करावे व आयुष्यभर दुःखी जीवन व्यतीत करावे. तसेच बालविवाहाच्या प्रथेमुळे त्याकाळात तरुण विधवांची संख्या जास्त असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळेच राजा राममोहन रॉय यांनी बंगाल प्रांतामध्ये १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच 'सती' प्रथेविरुद्ध मोठी चळवळ सुरू केली होती. राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नांमुळेच १८२९ साली भारताचे तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेन्टिक यांनी सती बंदीचा कायदा केला होता. बंगालमधील १९ व्या शतकातील दुसरे महत्त्वाचे समाज सुधारक ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी समाजातील तरुण विधवांची संख्या पाहून बंगालमध्ये विधवा पुनर्विवाहाची चळवळ सुरू केली होती. त्यांनी समाजातील तरुणांना तरुण विधवांशी लग्न करण्याचे आवाहन केले होते व स्वतःदेखील विधवेशी लग्न केले होते. बंगालमधील या विधवा पुनर्विवाह चळवळीची दखल घेऊन भारताचे तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांनी विधवा पुनर्विवाहाचे विधेयक बनविले होते. या विधेयकाचे कायद्यात रुपांतर करण्याचे श्रेय मात्र डलहौसीनंतर भारताचे गव्हर्नर जनरल बनलेले लॉर्ड कॅनिंग यांना जाते. येथे डलहौसींचा उल्लेख झाला आहे तर त्यांच्याविषयी थोडे लिहिण्याचा मोह आवरत नाही. लॉर्ड डलहौसी यांचा जन्म २२ एप्रिल १८१२ रोजी स्कॉटलंडमधील मिडलोथियन येथे (Midlothian) डलहौसी कासल (Dalhousie Castle) मध्ये झाला. ते १८४८ साली भारताचे गव्हर्नर जनरल झाले व १८५६ सालापर्यंत ते गव्हर्नर जनरल होते. त्यांच्या या आठ वर्षांच्या कालावधीत भारतात अनेक राजकीय घडामोडी झाल्या. डालहौसींनी त्यांच्या गव्हर्नर जनरलपदाच्या कालावधीत अनेक भारतीय प्रदेश व राज्य काबीज करून बिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्याचा विस्तार केला. भारतातील राज्ये काबीज करण्यासाठी त्यांनी युद्धे तसेच 'दत्तक खालसा धोरण' या दोन नीतींचा वापर मोठ्या प्रमाणात केला. यातील 'दत्तक खालसा' हे धोरण फार वादग्रस्त ठरले व १८५७ साली ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधात झालेल्या उठावाचे हे एक प्रमुख कारण होते असे अभ्यासक व इतिहासकार मानतात. लॉर्ड डलहौसी यांच्या काळात झालेली अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे परिवहन

(वाहतूक) व दळणवळणाच्या क्षेत्रात झालेली प्रगती ही होय. १९ व्या शतकात भारतात सार्वजनिक बांधकाम विभागाची सुरुवात करण्याचे श्रेय लॉर्ड डलहौसींना जाते असे इतिहासकारांचे मत आहे. लॉर्ड डलहौसींच्या काळात भारतातील पहिली रेल्वे १८५३ साली मुंबई ते ठाण्याच्या दरम्यान धावली व संपूर्ण भारतभर रेल्वेचे जाळे पसरण्यास सुरुवात झाली. त्यांच्याच काळात पोस्टाची सेवा तसेच इलेक्ट्रीक टेलीग्राफची सेवा सुरू झाली व भारत खऱ्या अर्थाने जवळ येऊ लागला व भारताचे राजकीय ऐक्य होणे शक्य झाले असे काही अभ्यासकांचे मत आहे. लॉर्ड डलहौसींबाबत एक गोष्ट अशी नमूद कराविशी वाटते की, भारतात व इंग्लंडमध्येदेखील त्यांची प्रशंसा करणारे, तसेच त्यांच्यावर टीका करणारे असे दोन गट आढळतात. भारतातून इंग्लंडला परत गेल्यावर लॉर्ड डलहौसी यांचे शेवटचे दिवस वाईट परिस्थितीत गेले. त्यांना पाठीचे दुखणे तर होतेच. त्यातच १८५३ साली त्यांच्या पत्नीचे (सुसान डलहौसी) निधन झाले. शेवटी १९ डिसेंबर १८६० रोजी म्हणजेच भारतातून इंग्लंडला गेल्यानंतर अवघ्या चार वर्षांच्या कालावधीत लॉर्ड डलहौसी यांचे डलहौसी कसलमध्ये (मिडलोथियन) म्हणजेच स्कॉटलंडमध्ये निधन झाले व त्यांना कॉकपेन (Cockpen) येथील चर्चच्या परिसरात दफन करण्यात आले. असो. तर येथे विधवा पुनर्विवाहाबाबतची एवढी पार्श्वभूमी देण्याचे कारण म्हणजे बाळशास्त्रींनी आपल्या 'दर्पण' पत्रातून व एकंदरीतच पत्रकारितेतून विधवा पुनर्विवाहाबाबत समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.

बाळशास्त्रींच्या जन्म तारखेविषयी अभ्यासकांमध्ये एकमत नाही. काहींच्या मते त्यांचा जन्म १८१० साली झाला असावा तर काही अभ्याकांच्या मते त्यांचा जन्म १८१२ साली झाला असावा. मराठवाड्यातील प्रसिद्ध अभ्यासक डॉ. अनिल कठारे यांनी आपल्या 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स.१८१८ ते १९६०)' या पुस्तकात बाळशास्त्रींचा जन्म २० डिसेंबर १८१० साली झाला असे म्हटले आहे. नीला उपाध्ये यांना मात्र त्यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८१२ रोजी झाला असावा असे वाटते. असो. बाळशास्त्रींच्या जन्मतारखेविषयी जरी एकमत नसले तरी त्यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभुर्ले या गावी झाला होता हे सर्वमान्य झाले आहे. पूर्वी सिंधुदुर्ग जिल्हा हा रत्नागिरी जिल्ह्याचाच भाग होता व १९८१ साली रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन सिंधुदुर्ग हा जिल्हा निर्माण झाला. हे दोन्ही जिल्हे महाराष्ट्रातील कोकण विभागातील समुद्र किनारा असणारे सुंदर जिल्हे आहेत हे आपणास ठाऊक आहेच. बाळशास्त्री हे कऱ्हाडे ब्राह्मण होते. कऱ्हाडे ब्राह्मण हे मूळचे देशावरील सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड परिसरातील होत. त्यामुळेच त्यांना कऱ्हाडे ब्राह्मण असे म्हटले गेले. ही ब्राह्मण कुटुंबे काही वर्षांपूर्वी देशाहून कोकणात स्थलांतरीत झाली. बिटिश काळात अनेक ब्राह्मण कुटुंबे मुंबईत स्थलांतरीत झाली. यात कोकणातील कऱ्हाडे ब्राह्मणांचादेखील समावेश होता. क्रमशः

**संदर्भ**


- युगप्रवर्तक बाळशास्त्री जांभेकर : काळ आणि कर्तृत्वः नीला उपाध्ये
- आचार्य बाळशास्त्री जांभेकर : व्ही. ए. पाटील
- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास : डॉ. अनिल कठारे
- नाईन्टींथ सेंच्युरि हिस्ट्री ऑफ महाराष्ट्र (खंड १ व खंड २) : बी. आर. सुनथनकर
- अ न्यू लूक ॲट मॉडर्न इंडियन हिस्ट्री : बी. एल. गोव्हर, अलका मेहता


**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

ज्यांना निसर्गाने उदासीन वृत्तीचे भक्कम संरक्षण दिलेले असते, ते फार सुखी! – मोपॉसॉ

# पाच लाखाचा पतंग ...

*नुकत्याच सादर झालेल्या मोदी सरकारच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करणारा चंद्रशेखर टिळक यांचा लेख – संपादक*

मला शाहरुख खान नट म्हणून आवडत नाही. त्याचा रईस हा सिनेमा तर मला बिलकूलच आवडत नाही.

पण तरीही गेले दोन दिवस मला त्या सिनेमातला एक डायलॉग सारखा आठवतो आहे. त्या सिनेमात शाहरुख खान त्याच्या व्यावसायिक प्रतिस्पर्ध्यांना म्हणतो, 'पतंग उडवताना पतंग कापला जाण्याची शक्यता आहे हे मला माहिती आहे. पण जर खरंच पतंग उडवायचा असेल तर पतंग प्रत्यक्षात हातात घेऊन तो उडवावा लागतो. त्यासाठी नुसते फिरकी हातात घेऊन मागे उभे राहून पुरत नाही'.

सध्या मकर – संक्रांतीचे दिवस सुरू आहेत. त्या काळात महाराष्ट्रात 'तिळगूळ घ्या, गोड बोला' म्हणायची पद्धत आहे; तर गुजरात मधे पतंग उडवण्याची.

आत्ता या तीन गोष्टी आठवण्याचं कारण म्हणजे सध्या आपल्या देशाच्या सामाजिक–आर्थिक क्षेत्रात एका बातमीचा असाच मस्त पतंग उडत आहे. खरं म्हणजे, उडवला जात आहे.

१ फेब्रुवारी २०१९ रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात आयकर कायद्याच्या तरतुदीत बदल होत करमुक्त उत्पन्नाची मर्यादा पाच लाख रुपये होणार असा मेसेज सध्या व्हाट्सअप सारख्या सोशल मीडिया मधे जोरात फिरत आहे.

मी स्वतः मध्यमवर्गीय नोकरदार – पगारदार माणूस आहे. त्यामुळे असे झाले तर मला हवेच आहे. त्यात माझा फायदाच आहे.

पण म्हणतात ना, मन चिंती ते वैरी न चिंती ...

कारण प्रत्यक्षात असं होण्याची सूतरामही शक्यता नाही असंच माझे मला अंतर्मन सांगत आहे. (प्रचलित भारतीय राजकारणात अंतरात्मा शब्दाची मालकी की मालकीण वेगळे आहे. आक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाल्यामुळे. असो.) हे होणार नाही. म्हणूनच मी त्याला पतंग म्हणत आहे. त्याला कारणे अनेक आहेत.

पहिलं कारण म्हणजे हा पतंग राजकीय जास्त आणि आर्थिक कमी आहे. महाराष्ट्र विधानसभा आणि लोकसभा निवडणुका एकाचवेळी होण्याची शक्यता आहे. अगदी तशा त्या एकाचवेळी झाल्या नाहीत तरीही त्या एकापाठोपाठ एक होतीलच. त्यामुळे ही बातमी फिरण्याची वेळ नक्कीच लक्षात घेण्याजोगी आहे. हे प्रत्यक्षात झाले तर हा 'चुनावी जुमला' आहे असं म्हणायला वाव मिळतो. (खुल्या प्रवर्गातील आर्थिक मागासांसाठी १० टक्के आरक्षण धोरण आणि त्याचा गुजरात आणि तेलंगण राज्यांनी ताबडतोब केलेली अंमलबजावणी यावरून झालेली चर्चा इथे आवर्जून लक्षात घेण्याजोगे आहे.)

हे प्रत्यक्षात झाले नाही तर पुन्हा खात्यात पंधरा लाख रुपये सारखा गोंधळ घालायला मोकळे. असं सगळे आहे. गाजराची पुंगी वाजली तर वाजली; नाहीतर मोडून खाल्ली.

पाच लाख रुपये काय आणि पंधरा लाख रुपये काय, सरकार, अर्थमंत्री सोडून सगळे बोलतात. भारतीय राजकारणात एकंदरीत ५ या आकड्याला प्रसिद्धी मिळते. ५५ (कोटी), १५ (लाख) आणि आता ५ (लाख) हेच खरे!

झोपलेले कोल्हे कधी कोंबडी पकडू शकत नाहीत. – बेंजामिन फ्रँकलिन

पाच लाख रुपये अशी करमुक्त उत्पन्नाची मर्यादा १ फेब्रुवारी २०१९ रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात न होण्यात संसदीय संकेत हेही एक कारण असेल. १ फेब्रुवारी रोजी सादर होणारा अर्थसंकल्प हा अंतरिम (इण्टेरिम) स्वरूपाचा आहे. अशा अर्थसंकल्पात फक्त पुढच्या काही महिन्यांच्या खर्चाची तरतूद करून घेणे हीच एक गोष्ट असते. त्यात तात्विक चर्चा जरूर करता येते. पण अंतरिम अर्थसंकल्पात धोरणात्मक निर्णय घेतले जात नाहीत आणि त्यामुळे ते जाहीरही केले जात नाहीत असा आजपर्यंत आपल्या देशाच्या संसदीय इतिहासात पाळला गेलेला संकेत आहे. आणि हा संकेत १ फेब्रुवारी २०१९ ला पायदळी तुडवला जाईल असे मानण्याचे कोणतेही कारण आजमितीस तरी दिसत नाही.

याबाबत अजूनही एक आणि तिसरे कारण असे आहे की, जर फक्त खर्चाची तरतूद इतकाच १ फेब्रुवारी २०१९ च्या अर्थसंकल्पात ऑपरेटिंग भाग असेल तर आणि तरच तो अर्थसंकल्प लोकसभा निवडणुकीचा आचार –संहितेचा काळ सुरू होण्याआधी संमत होईल. पण जर त्यात पाच लाख रुपये आयकर – मुक्त उत्पन्ना सारखी कोणतीही धोरणात्मक घोषणा असेल तर अर्थसंकल्प – संमतीची प्रक्रिया पूर्णपणे अंमलात आणली जावी अशी मागणी पुढे येऊ शकते . अशी मागणी पुढे आली (आणि ती शक्यता सध्याच्या राजकीय वातावरणात जरासुद्धा नाकारता येत नाही ) तर याबाबत इकडे आड, तिकडे विहीर अशी केंद्र सरकारची परिस्थिती होईल. जर ही मागणी मान्य करावी तर आचार – संहिता सुरू होण्याआधीच अर्थसंकल्प संमत होणार नाही. ही मागणी अमान्य करावी तर राज्यसभेत सत्तारूढ पक्षाला बहुमत नाही. शिवाय कोणीतरी त्याबाबत कोर्टात धाव घेतल्यावाचून राहणार नाही.

ही चर्चा पुस्तकी, सैद्धांतिक, जर – तर स्वरूपाची नाही. १ फेब्रुवारीचा अर्थसंकल्प पूर्ण अर्थसंकल्प असेल अशीच चर्चा अगदी डिसेंबर २०१८ अखेरपर्यंत होत होती. पण १ फेब्रुवारी २०१९ रोजी अंतरिम अर्थसंकल्प येईल हे आता स्पष्ट झाले आहे.

पाच लाख रुपये आयकर–मुक्त उत्पन्न हे १ फेब्रुवारी २०१९ च्या अर्थसंकल्पात न होण्याची शक्यता असण्याचे अजून एक आणि चौथे कारण म्हणजे सिक्कीम राज्याने युनिव्हर्सल बेसिक इनकम बाबत केलेले सूतोवाच. त्या घोषणेनुसार सिक्कीम राज्यांत प्रत्येकी किमान दरमहा सात हजार रुपये उत्पन्न मिळण्याची हमी राज्य सरकार देणार आहे. ही बातमी जर खरी असेल आणि ती जर प्रत्यक्षात अंमलात आली तर तो एक वेगळाच प्रयोग असेल. सध्याच्या बातमीनुसार अशी हमी देताना बाकीच्या सर्व सवलती आणि अनुदाने (अन्न, खत, पेट्रोल, वीज, पाणी वगैरे) पूर्णपणे किंवा काही प्रमाणात तरी काढून घेण्याचा सिक्कीम राज्य सरकार विचार करत असल्याची चर्चा आहे. अनेक सवलती 'आधार'शी जोडण्याचा विद्यमान केंद्र सरकारचा उद्देश होता आणि आहे. पण त्यात काहीवेळा काही कायदेशीर आणि तांत्रिक अडचणी आल्या. त्यामुळे सिक्कीम सरकारच्या प्रयोगाबाबत सर्वांनाच उत्सुकता असेल.

तसंही दोन वर्षांपूर्वीच्या केंद्रिय अर्थसंकल्पात आणि अर्थसंकल्प–पूर्व आढाव्यात युनिवर्सल बेसिक इनकमची चर्चा होतीच की !!!

याबाबत लक्षात घेण्याजोगे पुढचे आणि पाचवे कारण म्हणजे केंद्रीय अर्थमंत्री मा. अरुण जेटली यांची कार्यशैली. गेल्या साडेचार वर्षात, निदान आयकरा बाबत तरी, जेंव्हा जेंव्हा त्यांनी सवलत दिली, त्याच दमात आणि त्याच वेळी, अगदी त्या प्रमाणात नसले तरी अधिभार (आपल्या नेहमीच्या मराठीत सांगायचं तर सरचार्ज) लावले आहेत. मला तर नेहमी प्रश्न पडतो की, यांचे नाव अरुण जेटली आहे की अधिभार जेटली? जर यशवंत सिन्हा यांची नोंद इतिहासात 'Role- Back सिन्हा' अशी होणार असेल तर कदाचित अरुण जेटली यांची नोंद 'अधिभार जेटली' अशी होईल

ज्याने या जीवनातील धकाधकीत टिकून राहावे अशी ईश्वराची इच्छा असते, त्याला तो स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची देणगी बहाल करतो. – हेन्रिक इब्सेन

अशी मला शंका वाटते.

हा इतिहास लक्षात घेता असला 'भीक नको, पण कुत्रा आवर' सारखा प्रकार यावेळी होणे कठीण दिसते. कारण असा धोका निवडणुकीच्या तोंडावर न स्वीकारण्या इतके चतुर जेटली साहेब नक्कीच आहेत !

असं न होण्याबाबतचे सहावे कारण म्हणजे आयकराचे स्वरूप. काळाच्या ओघात एकूण सरकारी उत्पन्नात आयकराचे प्रमाण कमी कमी होत असले तरी आजही ती रक्कम नगण्य नाही. मा. द. रा. पेंडसे यांच्या सारखे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ १९८० च्या दशकापासून आयकर रद्द करण्याची मागणी करत आहेत. आयकरापासून सरकारला जितके उत्पन्न मिळते, त्यापेक्षा जास्त खर्च हे उत्पन्न मिळवण्यासाठी सरकारला करावा लागतो असं पेंडसे साहेब म्हणत असत !

आजही अर्थक्रान्तिचे अनिल बोकील अशी मागणी करत आहेतच की !

पण तरीही हा कर रद्द होणं तर सोडाच, पाच लाख रुपये अशी आयकर – मुक्त उत्पन्नाची मर्यादा होणे ही १ फेब्रुवारी २०१९ च्या अर्थसंकल्पात अशक्य बाब आहे. धोरणात्मक घोषणा हे त्याचे एकमेव कारण नाही.

आजमितीला असणारी आर्थिक परिस्थिती पाहू जाता, आत्ता कोणतेही सरकार सत्तारूढ असते तरी हे करणार नाही.

जोपर्यंत वस्तू – सेवा करापासून चे उत्पन्न एका विशिष्ट पातळीवर स्थिर होत नाही, तोपर्यत हे होणार नाही. कारण आजमितीस वैयक्तिक आयकर हे केंद्र सरकारचे उत्पन्नाचे असे साधन आहे की वर्षभरात त्यात बदल होत नाही. ना उत्पन्नाचे प्रमाण बदलते, ना त्याचे सातत्य. डिमौनिटायझेशन नंतर तर आयकर भरणाऱ्या व्यक्तींची संख्या आणि त्यापासूनचे उत्पन्न यात वाढ झाली आहे. असे वाढीव उत्पन्न सोडण्याची घाई कोणताच अर्थमंत्री करणार नाही.

मुळातच इतका दबाव सरकारवर आणण्या इतपत वैयक्तिक आयकर दाते एक गट म्हणून संघटित, सक्रिय, सबळ आणि सक्षम नाहीत. त्यामुळे ते नेहमीप्रमाणेच गृहीत धरले गेले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

याचा दुसरा एक पैलू असा आहे की, केंद्र सरकारला रिझर्व्ह बँक पत – पुरवठा करत असते. त्या पद्धतीला Ways and means advances असं म्हणतात. त्या पद्धतीचा एक निकष दैनंदिन वित्तीय तूट (Daily -verage Deficit) हा आहे. अशी तूट नियंत्रित ठेवण्यात वैयक्तिक आयकर (Personal Income Tax) सारख्या स्थिर उत्पन्नाचा महत्त्वाचा वाटा असतो. ही तूट जेवढी कमी तेवढे सरकारचे पतमापन (क्रेडिट रेटिंग) वरच्या पातळीवरचे. असे पतमापन जेवढे चांगले, तेवढा पतपुरवठा करायच्या व्याजाचा दर कमी. व्याजाचा दर जितका कमी, तितका केंद्र सरकारला पैसे उभे करण्याचा खर्च कमी. हा खर्च जितका कमी तितके राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतले व्याजदर आणि महागाईचा दर कमी असे ते गणित आहे. हे गणित बिघडवण्याचा धोका मध्यावधी निवडणुकीच्या तोंडावर कोणता अर्थमंत्री पत्करेल? आणि त्यांनी पत्करावा तरी का? विशेषतः सध्या केन्द्र सरकार आणि रिझर्व्ह बँक यांचे संबंध लक्षात घेता तर हे होण्याची शक्यता नाहीच नाही.

मुळातच पाच लाख रुपये आयकर – मुक्त उत्पन्न ही संकल्पना आली ती काही वर्षांपूर्वी प्रत्यक्ष कर – संहिता (डायरेक्ट टक्स कोड ) चा मसूदा आला त्यात. पण त्यावेळी असणारी आपल्या देशात असणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करप्रणाली आणि आजमितीची त्याबाबतची स्थिती यात खूप फरक आहे. त्यानुसार आज ती कल्पना बदलावी लागेल. तेवढा वेळ विद्यमान केन्द्र सरकार जवळ आता उरला आहे असे वाटतं नाही.

एकंदरीत काय, पाच लाख रुपये आयकर – मुक्त उत्पन्न ही वस्तुस्तिथी न होता व्हाट्सअप मेसेज राहण्याचीच शक्यता जास्त आहे.

(पृष्ठ क्र.१९वर)

# सैन्याला 'सॅल्युट', बारामुल्ला 'ऑलआउट'

*अलीकडेच भारतीय सैन्याने लष्करे तय्यबाच्या तीन दहशतवाद्यांना बारामुल्ला जिल्ह्यातील बिन्नेर या गावामध्ये ठार मारण्यात आले. त्यानंतर हा जिल्हा दहशतवादमुक्त म्हणून घोषित करण्यात आला. काश्मीरमधील दहशतवाद्यांविरोधातील लष्करी मोहिमा या रात्रीच्या वेळी राबवण्यात येत आहेत. बारामुल्लातील कारवाई ही रात्री तीन वाजता करण्यात आली. याचाच अर्थ संपूर्ण भारत जेव्हा सुखाची निद्रा घेत होता तेव्हा आपले सैन्य जागता पहारा देऊन, डोळ्यांत तेल घालून जीवाची बाजी लावत दहशतवादाविरुद्ध लढते आहे. उणे २५ अंशांपर्यंत घसरलेले तापमान, तुफान बर्फवृष्टी होत असताना लढणाऱ्या आपल्या जवानांच्या या कामगिरीचे देशभरातून कौतुक व्हावयास हवे.– संपादक*

गेल्या ३० वर्षांपासून भारताच्या जम्मू आणि काश्मीरमध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाने उच्छाद मांडलेला आहे. प्रत्यक्ष युद्धात भारताला पराभूत करणे शक्य नसल्याचे लक्षात आल्यानंतर पाकिस्तानने पुकारलेल्या या प्रॉक्सी वॉरचा सामना करताना आजवर भारताचे असंख्य जवान हुतात्मा झाले आहेत. शेकडो सामान्य निष्पाप नागरिकांचाही बळी गेला आहे. आज तीन दशकांनंतरही पाकिस्तानच्या कुरापती सुरूच आहेत.



तथापि, आता या लढ्यामधला एक ऐतिहासिक आनंदाचा क्षण आपल्याला प्राप्त झाला आहे. मागील आठवड्यामध्ये जम्मू–काश्मीरमधील बारामुल्ला हा जिल्हा गेल्या ३० वर्षांत पहिल्यांदा दहशतवादमुक्त जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे. याचा अर्थ बारामुल्ला या जिल्ह्यामध्ये एकही स्थानिक दहशतवादी अस्तित्त्वात नाही. ही एक अत्यंत ऐतिहासिक आणि महत्त्वाची घडामोड आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादी कारवायांची सुरुवात झाल्यानंतरची ही सर्वांत मोठी उपलब्धी आहे.

यातून दोन गोष्टी प्रतिबिंबित होत आहेत. पहिली गोष्ट म्हणजे भारतीय लष्कराच्या 'ऑपरेशन ऑलआऊट' या मोहिमेअंतर्गत आपले जवान पाकपुरस्कृत दहशतवादाविरोधात अत्यंत तीव्र लढा देत आहेत. बारामुल्ला जिल्हा दहशतवादमुक्त होणे हे या मोहिमेचे आणि जवानांचे मोठे यश आहे. दुसरीकडे दहशतवादाच्या मुळावर घाव घातला गेला असून दहशतवादाच्या पाठीचा कणा यामुळे मोडला गेला आहे.

मागील आठवड्यामध्ये लष्कराने एक मिलिटरी ऑपरेशन राबवले. यामध्ये पाकिस्तानने पोसलेल्या लष्करी तय्यबा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेच्या तीन दहशतवाद्यांना बारामुल्ला जिल्ह्यातील बिन्नेर या गावामध्ये ठार मारण्यात आले. त्यानंतर हा जिल्हा दहशतवादमुक्त म्हणून घोषित करण्यात आला. हे तीन दहशतवादी गेल्या तीन वर्षांपासून बारामुल्ला जिल्ह्यामध्ये दडून बसलेले होते आणि अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्यांचा हात असल्याचे स्पष्ट झाले होते. मागच्या वर्षी तीन युवकांची हत्या करण्यात आली होती. तत्पूर्वी २०१७ मध्ये

पोलिसांवर झालेला हल्ला अशा अनेक हल्ल्यांमध्ये हे तीन दहशतवादी सहभागी होते.

या तीन दहशतवाद्यांना पकडण्यामध्ये आणि त्यांना ठार मारण्यामध्ये बारामुल्ला जिल्ह्यातील लोकल इंटेलिजन्स किंवा स्थानिक गुप्तवार्ता अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, काश्मीर खोऱ्यातील स्थानिकांचे दहशतवादाला समर्थन देण्याचे प्रमाण हळूहळू कमी व्हायला लागले आहे.

बारामुल्ला आणि श्रीनगर हे दोन्ही शेजारी शेजारी असणारे जिल्हे आहेत. या दोन्हीही जिल्ह्यांत दहशतवादी हिंसाचाराचे प्रमाण मोठे होते. विशेषतः बारामुल्ला जिल्हा हा दहशतवाद्यांचा गड मानला जात होता. खास करून हिज्बुल मुजाहिद्दीन या संघटनेचे अनेक सक्रिय दहशतवादी या जिल्ह्यामध्ये होते. गेल्या दोन वर्षांमध्ये भारतीय सैन्याने बारामुल्ला जिल्ह्यामध्ये ५० दहशतवादी मारले आहेत. या ५० पैकी गेल्या वर्षभरामध्ये ३५ दहशतवाद्यांना ठार करण्यात आले आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये पाकव्याप्त काश्मीरमध्ये हिज्बुल मुजाहिद्दीन, जमात उद दला, लष्करे तैय्यबा, जैश ए मोहम्मद यांसारख्या दहशतवादी संघटनांचे प्रशिक्षित दहशतवादी घुसखोरी करून काश्मीरमध्ये प्रवेश करतात. इथे आल्यानंतर त्या भागातील स्थानिक काश्मिरी तरुणांची माथी भडकावण्याचे, त्यांचे ब्रेनवॉश करण्याचे काम या दहशतवाद्यांकडून केले जाते. कालांतराने याच स्थानिकांच्या मदतीने हे पाकिस्तानातून आलेले दहशतवादी काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले करतात. गेल्या ३० वर्षांपासून ही कार्यप्रणाली जम्मू आणि काश्मीरमध्ये चाललेली आहे. तथापि, बारामुल्ला जिल्ह्यातील जे तरुण पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या चिथावणीला, भूलथापांना बळी पडले होते त्यांचे व्यवस्थितपणाने समुपदेशन करण्यात आले. या माध्यमातून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे, त्यांना परत बोलावण्यात आले आहे. ही फार मोठी उपलब्धी आहे. कारण यामुळेच बारामुल्ला जिल्हा हा दहशतवादमुक्त म्हणून घोषित करण्यात आला आहे. वास्तविक, असाच प्रकार किंवा अशीच प्रक्रिया श्रीनगरमध्येही राबवण्यात येत आहे; पण त्या संदर्भातील औपचारिक घोषणा अद्याप झालेली नाही.

२०१८ मध्ये जम्मू आणि काश्मीरमध्ये २५० दहशतवाद्यांना ठार केले आहे. चालू वर्षी म्हणजे जानेवारी २०१९ मध्ये १९ दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात लष्कराला यश आले आहे. गेल्या तीन दिवसांमध्ये ९ दहशतवादी मारले गेले आहेत. यावरून असे लक्षात येते की, ऑपरेशन ऑलआऊटच्या माध्यमातून काश्मीरमध्ये भारतीय लष्कर अत्यंत निकराने आणि नियोजनबद्धरित्या दहशतवाद्यांचा बिमोड करत आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

या संदर्भात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ही सर्व मिलिटरी ऑपरेशन्स मध्यरात्रीच्या सुमारास राबवण्यात येत आहेत. बारामुल्लातील कारवाई ही रात्री तीन वाजता करण्यात आली. याचाच अर्थ संपूर्ण भारत जेव्हा सुखाची निद्रा घेत होता तेव्हा आपले सैन्य जागता पहारा देऊन, डोळ्यांत तेल घालून जीवाची बाजी लावत दहशतवादाविरुद्ध लढते आहे. सध्या जम्मू-काश्मीरमध्ये कमालीची थंडी असून तापमानाचा पारा उणे २५ अंशांपर्यंत घसरले आहे. तेथे तुफान बर्फवृष्टी होत आहे. अशा वेळी भारतीय लष्कर बर्फावर झोपून प्रचंड थंडीमध्ये रात्रीच्या वेळी जागून हे ऑपरेशन राबवत आहेत. देशाच्या प्रत्येक नागरिकाने याबाबत आपल्या सैन्याचे कौतुक करावयास हवे.

काही महिन्यांपूर्वी जम्मू काश्मीरमध्ये राज्यपाल राजवट लागू झाली आणि आता त्याचे रुपांतर राष्ट्रपती राजवटीमध्ये झाले असून, दहशतवादविरोधी कारवाईची

जो इतरांचे जीवन नासवतो, तो स्वतःही नासविला जातो. - ओव्हिड

सर्व सूत्रे आता लष्कराच्या हाती सोपवण्यात आली आहेत. लष्कर आपली कामगिरी नेहमीप्रमाणेच अत्यंत उत्तम प्रकारे पार पाडत आहे. अर्थात, बारामुल्ला दहशतवादमुक्त झाला असला तरी काश्मीरमध्ये आजही २३० दहशतवादी सक्रिय आहेत. हे दहशतवादी वेगवेगळ्या जिल्ह्यांत सक्रिय असून विशेषतः उत्तर काश्मीरमध्ये त्यांचा प्रभाव जास्त आहे. हे दहशतवादी एकेका जिल्ह्यांमधून फिरत असतात. तथापि, भारतीय लष्कराचा सध्याचा काश्मीरमधील दहशतवादविरोधी कारवाईचा वेग पाहता २३० दहशतवाद्यांचा खातमा करायला फार वेळ लागणार नाही. लवकरच हे उद्दिष्ट साध्य केले जाईल.

आज इतक्या वर्षांनंतर पहिल्यांदाच लष्कराला जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादावर संपूर्ण नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. ही एक संधी मानून तिचे सोने करण्यासाठी आता पावले टाकली गेली पाहिजेत आणि उपाययोजनांचा वेग वाढवला गेला पाहिजे. काश्मीरमधील तरुणांना दहशतवादाकडे आकृष्ट करून घेण्यासाठी आयसिसपासून लष्करे तैय्यबासारख्या सर्व संघटना टपलेल्या आहेत. याचे कारण सीमेवरील गस्त प्रचंड वाढल्यामुळे भारतात घुसखोरी करणे अवघड झालेले आहे. त्यामुळे या संघटना इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून स्थानिक दहशतवाद्यांना आवाहन करण्याचे काम करत आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्याला वेगवेगळ्या स्तरावर समुपदेशन घडवून आणावे लागणार आहे. कारण दहशतवाद्यांना ठार मारण्याचे काम लष्कर करू शकते; पण दहशतवादाकडे आकर्षित होणाऱ्या तरुणांना रोखायचे असेल तर विविध स्तरावर, विविध लोकांना सहभागी करून घेऊन एक सर्वसमावेशक समुपदेशन कार्यक्रम आखावा लागणार आहे. यामध्ये स्थानिक धर्मगुरुंचा, प्राध्यापकांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. कारण दहशतवाद्यांच्या भूलथापांना बळी पडणारा काश्मिरी तरुण हा सुशिक्षित आहे. म्हणूनच विद्यापीठांमधून, महाविद्यालयांमधून असे समुपदेशनाचे वर्ग चालवावे लागतील. यामध्ये काश्मीरमधील समाजशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ यांची मदत महत्त्वाची ठरेल. बारामुल्लातील भारतीय लष्कराच्या यशामुळे दहशतवाद्यांचा आत्मविश्वास कमी झाला आहे. इतरही जिल्हे येणाऱ्या काळात अशा प्रकारे दहशतवादमुक्त होऊ शकतात. त्यामुळे आताची वेळ ही चर्चेला सुरुवात करण्यासाठीही सुयोग्य आहे.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी – ९७०२०३५८००

●●●

---

(पृष्ठ क्र.१६ वरून- **पाच लाखाचा पतंग ...**)

हा पतंग कापला जाणार ही शक्यता जास्त. काय पो छे ...

या परिस्थितीचे वर्णन सुप्रसिद्ध पाश्चिमात्य कादंबरीकार जेफ्री आर्चर यांच्या एका कादंबरीचे नाव घेत करायचे झाले तर ते Only Time Will Tell असंच करावे लागेल.

तोपर्यंत मी तरी याबाबत स्वतःला इतकेच सांगतो आहे....के सेरा सेरा (जो होगा सो होगा).

**– चन्द्रशेखर टिळक**
सी –४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

●●●

---

कृतघ्न माणसाइतकी गलिच्छ वस्तू या भूतलावर सापडणार नाही. – ऑसोनियस

# जाणिवांचे दिवे

*मराठी मनाला तरल संवेदना देणाऱ्या जाणिवांचे दिवे या कवी श्रीपाद जोशी यांच्या कवितासंग्रहाचे पुण्यात प्रकाशन झाले. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी होऊ घातलेल्या मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ कवी कमलाकर देसले यांनी श्रीपाद जोशी यांच्या जाणिवांचे दिवे या कवितासंग्रहाचे केलेले रसगर्भ परीक्षण दिशाच्या वाचकांसाठी देत आहोत - संपादक*

नेणिवेच्या ओळी लख्ख उजळवणारा श्रीपाद जोशी यांचा काव्यसंग्रह : 'जाणिवांचे दिवे '

श्रीपाद जोशी या मनस्वी कवीचा जाणिवांचे दिवे हा कवितासंग्रह 'स्वयं' प्रकाशन, सासवडतर्फे पुण्यात शाहीर सुरेशकुमार वैराळकर यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ लेखक राजन खान यांच्या उपस्थितीत २९ ऑक्टोबर २०१७ रोजी प्रकाशित झाला.



जीवन लाख गतिशील असले तरी आज जगण्याला प्रचंड वेग आला आहे. व्यापार, विज्ञान, कला, अर्थ, मैत्र, माहिती, शेती, राजकारण, अर्थकारण ही सर्व क्षेत्रे जागतिकीकरणाने कवेत घेतली आहेत. महत्त्वाकांक्षेची केंद्र कायमच सत्ता आणि पैसा राहिली आहेत. शिक्षण, कला, धर्म आणि संस्कृती यांचा सत्तेवर पूर्वी अंकुश असायचा. राजकारणी स्वतः लेखक, कवी, विचारवंत असायचे. काही प्रमाणात का असेना विचारवंत, कलावंत, प्रतिभावंत यांच्या प्रभावात येण्यात राजकीय मंडळी स्वतःला धन्य मानीत. मात्र गेल्या वीस-बावीस वर्षांत चित्र बदलले आहे. सत्ता आणि पैशाच्या स्पर्धेत 'संस्कृतीची स्वस्तिकं' समजल्या जाणाऱ्या कलासुद्धा मागणी तसा पुरवठा या न्यायाने सत्ता आणि पैशाशी तडजोड करू लागल्यात. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली, की साहित्याचे सत्त्व जपणे किती महत्त्वाचे आहे हे लक्षात येते.

जागतिकीकरणाचा आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या सामाजिक, संस्कृतिक पडझडीचा रेशो पाहता, शिक्षणातून हद्दपार होत जाणारे छंद, वृत्त तसेच मातृभाषेची फरपट पाहता वर्तमानात छंदोबद्ध कविता, वृत्तबद्ध कविता जगेल का? तगेल का? असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. अशी काळजी करण्याच्या काळात श्रीपाद जोशी या नव्या उमेदीच्या कवीचा छंदोबद्ध, वृत्तबद्ध आणि मुक्तछंद अशा सर्व अभिव्यक्ती प्रकारांच्या सशक्त कवितांचा 'जाणिवांचे दिवे' हा कवितासंग्रह प्रचंड आशादायी चित्र निर्माण करणारा संग्रह आहे.

निर्मोहीपणाची मोहकता ही इतकी संमोहक असते, की भलेभले त्यातअडकत जातात. मेनका विश्वामित्रात तर विश्वामित्र मेनकेत गुंतत जातो. कविता ही अशीच जोगिण आहे. प्रतिभेचा विश्वामित्र तिच्यावर भाळला नाही तरच नवल. कविता ही सत्याची सावली असते. सत्य हे आकाशासारखे न संपणारे अंगण असते. या अंगणात जीवन क्रीडा करत असते. जीवन म्हणजे अनुकूल-प्रतिकूल अनुभवांच्या अनंत रंगांचा उत्सव असतो. हा रंगोत्सव ज्या सत्याच्या अंगणात साजरा होत असतो, कविता त्या सत्याची सावली असते. कवितेच्या सावलीला आकलनाच्या मिठीत खात्रीने धरता येत नाही, पण कवितेमुळेच सत्याच्या दिव्यतेचा-भव्यतेचा, सुरूपतेचा-कुरूपतेचा,

कृतघ्न मुलापासून होणारे दुःख हे सापाच्या विषारी दातापेक्षाही जास्त वेदना देणारे असते. - शेक्सपीअर

शोषणाचा-समृद्धीचा, मिलनाचा-वियोगाचा, दाहकतेचा-मोहकतेचा अंदाज घेता येतो. कविता जोगिण असते; आपल्याच नादात फिरणाऱ्या फुलपाखरासारखी. चांगला कवी हा परंपरेच्या वाटेवर चालणारा प्रतिभावंत फकीर असतो. तो नवे आकलन मांडत असतो. कविता ही गोष्ट अस्सल कविकडून आयुष्याचे दान घेते आणि तरीही चकवा देते. म्हणूनच श्रीपाद जोशी म्हणतात..

**या जन्माची जोगिण कविता मोह कशाचा जडला?**
**'सांजफुलांचा' वेलीवरचा बहर कशाने झडला?**
**कुठे समर्पित होउन झाली निर्माल्याची बाधा**
**पुन्हा नव्याने जन्माला ये होउन माझी राधा**

प्रेम आणि पीडा ह्याच सर्व कलांच्या, म्हणजेच कवितेच्यासुद्धा प्रेरणा आहेत. प्रेम आणि पीडेच्या परिघाने मानवी जीवन पूर्ण होते . प्रेम आणि पीडेची ठिणगी एक तर जाळून टाकते नाहीतर उजळून टाकते. कवी फार सुंदर शब्दात हे सांगतो...

**इतके समीप आलो अंतर मिटले आता**
**देहाचा कर्पूर पेटला समेस येता**
**जणू निरांजन दीपत्कारी नयन तुझे हे**
**कसे सावरू लागून गेली ठिणगी आता**

कविता ही प्रतिमांची भाषा असते. सरळ विधान करणे हा कवितेचा स्वभाव नसतो. कवी आपला सामान्य अनुभव नव्या आकलनाच्या उंचीवर नेतो. उन्हाळा उन्हाचा असतो हा सर्वसामान्य भौतिक अनुभव. पण मानसिक अनुभवांच्या संदर्भात बोलताना कवी जे प्रतिभेचे बोलणे बोलतो ते वाचून थक्क व्हायला होते. प्रेयसीचे आपल्या आयुष्यात नसण्याचे जीवघेणे सत्य काल जरी सावलीसारखे गारवा देणारे असले तरी आज याच गारव्याच्या दग्ध करून टाकणाऱ्या तप्त झळा आहेत. सावली ही पारंपरिक प्रतिमा विरोधी अर्थासाठी कवी किती समर्पकपणे वापरून सहजपणे अर्थ चमत्कृती साधतो हे लक्षात येते.

**तुझ्या सावल्यांचे किती मी उन्हाळे**
**असे झेलले दग्ध होऊनही**
**तुझ्या भाग्यरेषेत नव्हतो म्हणोनी**
**मला रोज विसरून जातोच मी**
**तुझ्या तप्त देहातली एक ठिणगी विझावी**
**कधीही न माझ्यातुनी**
**असावेत हुंकार कानी तुझे बस**
**जसा मंदिरातील घंटाध्वनी**

'आठवणींची शाळा' नावाची एक फार चित्रमयी कविता संग्रहात भेटते. ती वाचतांना वाचकाचा जगण्यातला मानसिक ग्लोबल स्पीड एकदम लोकल होतो. शांत आणि गतीशील होतो. एकांतात गलबलून यावं, खुप काही सुंदर गमावून आपण जे जीवघेणे सुख मिळवले आहे, त्या दुश्चक्रातून बाहेर येण्याच्या वाटा आपणच कोशकिड्याप्रमाणे बंद केल्याची खंत आपल्याला व्हावी. अशी एक वेगळी कविता 'आठवणींची शाळा' आपल्याला स्वप्नरंजनात नेते. मानसिक पातळीवर का होईना आपण आपले बालपण, आपले गाव, आपले घर, आपली शाळा, मातीचे घर, अंगण, पडवी, खेड्यातली पहाट, दिवेलागण, शेतशिवार, गायगुरांचा सहवास कायकाय नि कायकाय कवितेच्या माध्यमातून अनुभवून घेतो.

**पाउस पडतो, आठवणींची शाळा भरते,**
**सुटते बरेच काही रिमझिमते अन् बरेच काही झरते**
**शाळा पडवी अंगण माती सारवलेली खोली**
**वेण्या घालून दुडदुडणाऱ्या वर्गामधल्या पोरी**
**शाळेमध्ये दुथडी भरून वाहत राही ओढा**
**गरजत राही धुमसत राही पाऊस नुसता वेडा**

नागरी जीवनाचा वेग, धावपळ, सुखाच्या चुकणाऱ्या दुखऱ्या जागा, मानसिक गोंधळ, अपरिहार्यतेतून येणारे व्यसन आणि ते चुकीचे आहे असे वाटणारा विवेक, मानसिक रिक्तता न पेलता येणारी अधांतरी मनोवस्था या सर्वांतून पळून जाता यावे म्हणून

केला जाणारा आपला, घरच्यांचा, जगाचा असा कुणाकुणाचा विचार, जगण्याचा भागाकार, वजा झालेल्या गोष्टींचा गुणाकार, आयुष्याच्या बेरजा-वजाबाकीचे उभे आडवे चौकोन मांडून खेळला जाणारा सारीपाट, स्वताशी होणारी प्रतारणा अशा बहुपदरी मनोवस्थेला क्लिक करणारी 'विकेंड' ही कविता नागरी मानसिक कोलाहलाचा प्रातिनिधिक उद्गार आहे. स्वतःला उत्तेजित करत, आभासी विरक्तीचा प्रत्यय घेऊन गर्दीच्या शोधात फिरणाऱ्या तरीही आत्मशोधाची लालसा असणाऱ्या माणसाची कविता अंतर्बाह्य अंतर्मुख करते.

हा कवी कवितेला समोरच्या खुर्चीत बसवून तिच्याशी चर्चा करणारा कवी नाही . कविता ही या कविचा प्राण आहे. कवितेशी इतके तादात्म्य असणे, आणि त्यातून होणारा मानसिक त्रास कवी मोकळेपणाने बोलून दाखवतो.

**शक्य तितके दूर रहा**
**तिच्यापासून ....**
**कवितेपासून .....**

हा वैद्यकीय सल्ला मिळाल्यानंतर कवीचे कवितेपासूनचे दूर जाणे आणि हळूहळू प्रेतवत होणे लक्षात आल्यावर पुन्हा डॉक्टरांकडे जाणे. दीर्घ चर्चेनंतर..

**शक्य तितकं लिहित रहा ..**
**आता थांबवू नकोस कविता ...**
**तेव्हा तूही थांबशील...**
**कायमचा ...**

कविता हेच या कवीचे प्राणतत्त्व आहे, म्हणून हा कवी अतिशय अंतर्मुख आहे. प्रेम, विरह या भावना माणसाला केंद्रीभूत करतात. जगापासून विभक्त करतात. मग माणूस समुहात असूनही एकटा असतो. त्याला वेगळ्या एकांताची गरज नसते. श्रीपाद जोशी यांची कविता ही सुफी स्वभावाची कविता आहे. प्रेम आणि परमात्मा यांच्यातले एकत्व कळलेला आध्यात्मिक साधक हा सुफी स्वभावाचा कलंदर असतो. सूर्याने अनंतकाळ पृथ्वीचे प्रेमगीत गात पृथ्वीभोवती फिरावे तशी श्रीपाद यांची कविता प्रेम या एकाच भावनेभोवती फिरते आहे. विरह आणि त्यातून होणारी मानसिक उलघाल, त्यातून येणारा विवेक, त्यातून येणारी आशक मस्त फकिरी आणि या फकीरीतून डोकावणारे अध्यात्म हा श्रीपाद जोशी यांच्या कवितेचा काव्यस्वभाव आहे.

**सांग तरी तू हा रस्ता का कुठेच संपत नाही ?**
**चालत असतो असे वाटते, बहुदा चालत नाही**
**कोण कुणाचा आहे मी अन् कुठे चाललो आहे?**
**प्रश्न कितीही बोलत असले, उत्तर बोलत नाही ..**

स्वाभाविकतेमुळे या छंद, वृत्तावर या कविची पकड मजबूत आहे. या संग्रहातील छंदाची आणि वृत्ताची लय ही वाचकाला आशयाच्या दोन्ही बाजूला झुलवते. वाचकाच्या मनावर प्रतिभेचे एक विलक्षण गारुड श्रीपादची कविता वाचताना होत जाते. श्रीपादची मुक्तछंद कविता महानगरीय अस्थिर मनोवस्थेला सहीसही स्कॅन करते, तर छंदोबद्ध आणि वृत्तबद्ध कविता ही आदिम ग्रामीण लयीचे वाचकावर संमोहन करते. ग्रेस या महाकवीच्या प्रभावातून श्रीपाद यांची कविता जाते खरी, मात्र श्रीपादचे कवी असणे कुणाच्या प्रभावाचा प्रसाद नाही. श्रीपाद जोशी हा स्वभावत: कवी आहे. त्यामुळे त्याची कविता ही अस्सल कविता आहे. श्रीपाद गझल उत्तम लिहितो, मात्र गझलेचा स्वभाव स्वतंत्र असल्याने 'जाणिवांचे दिवे' या संग्रहात श्रीपाद्‌ची एकही गझल नाही. जाणिवांच्या दिव्यांच्या लख्ख प्रकाशात नेणिवेच्या ओळी वाचणाऱ्या या मनस्वी कविच्या काव्यप्रवासाला खूप शुभेच्छा !

जाणिवांचे दिवे : श्रीपाद जोशी
स्वयं प्रकाशन, सासवड ता. पुरंदर, जि. पुणे
मूल्य : १४९ /- पृष्ठसंख्या: ११३

**- कमलाकर आत्माराम देसले**

●●●

माणसे ही त्यांनीच बनविलेल्या हत्यारांची हत्यारे बनलेली आहेत. - थरो वॉल्डेन

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**स्नेहसंमेलन**

दरवर्षीप्रमाणे यंदाही इ.५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आनंदात पार पडले. इ.५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी विविध दर्जेदार कार्यक्रम सादर केले.

**क्रीडामहोत्सव**

विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, तसेच त्यांच्यातील खेळाडू वृत्तीला वाव मिळावा म्हणून क्रीडामहोत्सव आयोजित करण्यात आला होता. यात कबड्डी, खो-खो, लंगडी, डॉजबॉल, व्हॉलीबॉल या मैदानी व सांघिक खेळांबरोबरच वैयक्तिक खेळ आयोजित केले होते. खेळाडूंनी खेळात उत्साहाने सहभाग घेतला होता.

**स्काऊट-गाईड उपक्रम**

**आपत्ती व्यवस्थापन -** विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन दल यांच्याविषयी माहिती व्हावी यासाठी आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रात्यक्षिके करून दाखविली.

आपत्तीला सामोरे जाण्याआधी कोणती पूर्वतयारी करावी; त्याचबरोबर ठाण्यात आपत्ती निवारण केंद्रे कोठे आहेत याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी संतोष कदम यांनी दिली. ठाणे अग्निशमन दलाचे विभागीय अधिकारी गिरीश कुमार झळके यांनी शहरात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे महत्त्व स्पष्ट केले.

सदर उपक्रम राज्यपुरस्कार व राष्ट्रपती पुरस्कार परीक्षेस बसणाऱ्या स्काऊटस् व गाईडस्‌साठी घेण्यात आला होता.

**राज्यमेळावा -** दि.१ ते ७ डिसेंबर या कालावधीत अवतार मेहेरबाबा ट्रस्ट, अहमदनगर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट-गाईड राज्य मेळाव्यात शाळेतील १४ गाईड्स व १८ स्काऊटस्, २ शिक्षक सहभागी झाले होते. या मेळाव्यात शोभायात्रा, धाडसी खेळ, प्रश्नमंजुषा, फुडप्लाझा, लोकनृत्य, स्किलोरामा, संचलन असे विविध कार्यक्रम पार पडले. मेळाव्याचे उद्‌घाटन ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी जलसंधारणमंत्री राम शिंदे उपस्थित होते. मेळाव्यात घेण्यात आलेल्या संचलनास आपल्या शाळेस तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

**प्री.ए.टी. कोर्स -** गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर यांनी पंचमढी येथे प्री.ए.टी. कोर्स पूर्ण केला. सदर कोर्ससाठी ठाणे जिल्ह्यातून चार गाईड कॅप्टन पात्र ठरल्या.

**आनंदमेळावा -** इ.६वी, ७वी व ८वीच्या स्काऊटस् व गाईडस्‌ने शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात आनंद मेळाव्यात सहभाग घेतला. यंदा विविध खाद्य प्रकारांचे एकूण ३१ स्टॉल्स मांडण्यात आले होते. आनंद मेळाव्याचे उद्‌घाटन वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष मान. डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते झाले. प्रसंगी मुंबई हेडक्वार्टर कमिशनर व ठाणे स्काऊट-गाईड उपाध्यक्ष मान. सौ. मंगला करंदीकर तसेच संस्थेचे श्री. कयाळ सर व श्री. रसाळ, शाळेचे पर्यवेक्षक श्री. सोनावणे उपस्थित होते.

**निसर्ग मंडळ -** ठाण्यातील पर्यावरण व शिक्षण क्षेत्रातील

अभ्यासकीय संस्था जिज्ञासा ट्रस्ट, पर्यावरण दक्षता मंडळ, होप फर्न व युबिजीसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'ठाणे विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन' भरवले जाते.

या संस्थामधील कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना 'पक्ष्यांची ओळख व पक्षी निरीक्षण' या विषयावर माहिती दिली. त्यानिमित्ताने झालेल्या विविध स्पर्धेत विद्यार्थी सहभागी झाले. इ.७वी अ मधील समर्थ पाटील यास चित्रकलेचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

**पाणथळ भूमी दिवस –** २ फेब्रुवारी हा दिवस जागतिक पाणथळ भूमी दिवस म्हणून साजरा होतो. विद्यार्थ्यांमध्ये पाणथळ भूमीविषयी जागृती व्हावी म्हणून पर्यावरण दक्षता मंचतर्फे इ.७वीच्या विद्यार्थ्यांसाठी ठाण्यातील खाडी व इतर पाणथळ जागा यासंबंधी दृकश्राव्य माध्यमातून व्याख्यान आयोजित करण्यात आले.

### विज्ञान प्रदर्शन

• ४४ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन न्यू कळवा हायस्कूल आणि ज्यु. कॉलेज कळवा येथे ३ व ४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले होते.

• इ.९वी अ मधील आकाक्षा कोंढारे, तीर्था देवघरे इ.८वी अ मधील साक्षी लांजेकर, प्राची कोळी या विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट दादर, मराठी विज्ञान परिषद व कल्याण डोंबिवली म.न.पा. यांच्या संयुक्त विद्यमाने स.वा. जोशी विद्यासंकुल, डोंबिवली येथे प्रथमच विभागीय विज्ञान संमेलन आयोजित करण्यात आले. यात इ.६वीच्या विद्यार्थ्यांचे ३ गट व इ.९वीच्या विद्यार्थ्यांचा १ गट सहभागी झाले होते. या मधून इ.९वीच्या नावीन्य मेटकरी याच्या प्रकल्पास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक (७५००/– रु. व इस्त्रोची सहल) देऊन गौरविण्यात आले. त्याच्या प्रकल्पाचा विषय होता 'प्लास्टिकला पर्याय'. त्याने स्वतः विघटनशील प्लास्टिक तयार केले.

### वक्तृत्व स्पर्धा

ब्राह्मण सेवा संघातर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत इ.५वी ते ७वीच्या गटात वैष्णवी बागल (७ड) हिला प्रथम प्रथम क्रमांक प्राप्त झाला. विषय होता 'मी परीक्षार्थी'. भेटवस्तू व प्रशस्तिपत्रक असे पारितोषिकाचे स्वरूप होते.

### सावित्रीबाई फुले जयंती

दि.३ जानेवारी २०१९ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती शाळेत साजरी केली गेली. त्यानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच 'स्त्री शिक्षणाचे महत्त्व' सांगण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

दिवाळीची सुट्टी संपवून नव्या उत्साहाने सर्व विद्यार्थी व शिक्षक नवीन सत्रासाठी उत्सुक होते. २६ नोव्हेंबरला दुसरे सत्र सुरू झाले. या सत्रातील डिसेंबर व जानेवारी महिन्यातील उपक्रमांचा हा आढावा.

### २० डिसेंबर २०१८ : वार्षिक स्नेहसंमेलन

नर्सरी, ज्यूनियर व सिनीयर के. जी. विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन गुरुवार २० डिसेंबर रोजी पार पडले. नर्सरीच्या मुलांनी श्लोक म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली. कन्नड व इंग्रजी भाषांतील विविध गाण्यांवर सुंदर नृत्य करून मुलांनी पालकांना मंत्रमुग्ध केले. नर्सरी विभाग प्रमुख सौ. अपर्णा वरुडकर यांनी वार्षिक अहवाल, विविध उपक्रमांची माहिती देणारे प्रास्ताविक केले.

के. जी. विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांच्या प्रास्ताविकपर भाषणानंतर ज्यूनियर, सिनीयरच्या मुलांचे कार्यक्रम सादर झाले. मराठी, इंग्रजी, हिंदी भाषांतून

यंत्रे इतकी चोख कामे करू लागली आहेत की, इंजिनिअरला काही महत्त्वच उरलेले नाही. – इमरसन

असलेला गाण्यांवर या चिमुकल्यांनी ठेका धरला. तसेच सिनीयरच्या मुलांनी 'छत्रपती शिवाजी महाराज' यांच्यावर एक नाटुकले सादर केले.

सर्वच प्रेक्षक व पालकांनी मुलांच्या आत्मविश्वासाचे व कलागुणांचे भरभरून कौतुक केले.

**२४ डिसेंबर २०१८ – आंतरशालेय स्पर्धा**

'संस्कृती कलादर्पण' या संस्थेतर्फे मुलांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी नृत्य व नाटक विभागात स्पर्धांचे आयोजन केले जाते. दरवर्षी आमचे सिनीयर के. जी. चे विद्यार्थी यात सहभागी होतात. यावर्षी 'नमन'–गणपती वंदना हे नृत्य व 'शिवाजी महाराज' हे मराठी नाटुकले ही दोन सादरीकरणे या स्पर्धेत झाली. दोनही विभागातील तिसरे पारितोषिक आमच्या विद्यार्थ्यांना मिळाले तर जिजाबाईंची भूमिका करणाऱ्या कु. आर्या भानुशाली हिला सर्वोकृष्ट बालकलाकाराचे पहिले बक्षीस दिले गेले.

यंदाचे हे सलग सहावे वर्ष. आमचे विद्यार्थी या स्पर्धेत यश संपादन करत आहेत.

**२६ डिसेंबर २०१८ – (ख्रिसमस) नाताळ**

जगभरात २५ डिसेंबर हा दिवस येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस नाताळ म्हणून साजरा होतो, आम्ही शाळेत २६ डिसेंबरला हा सण साजरा केला. येशू ख्रिस्ताच्या जन्माचा देखावा, विविध चित्रे, रंगीत चांदण्या, तक्ते यांनी नर्सरी व के. जी. विभाग सुशोभित केला होता. नर्सरीतील कु. पार्थ देशमुख, ज्युनियर के.जी.ची कु. क्रिष्णाई खेडेकर (सनफ्लावर ग्रुप) व कु. युवराज पाटील (सिनीयर के.जी.–मून ग्रुप) हे सांताक्लॉज बनून आले होते. त्यांनी मुलांबरोबर गाणी म्हटली. नृत्य केले. केकचा गोड खाऊ या निमित्ताने मुलांना दिला गेला. लाल व पांढऱ्या रंगाचे कपडे घातलेली आमची सर्वच चिमुकली नाताळच्या शुभेच्छा देत आनंदाने परतली. ख्रिसमसचे झाड व सांताक्लॉजचे चित्र मुलांनी रंगवले होते.

**७ जानेवारी – नर्सरी व सिनियर के. जी**<br>**८ जानेवारी – ज्यूनियर के.जी** } **क्रीडादिन**

**नर्सरी** – धावणे, हुलाहुप रिंग, बेडूक उड्या या तीन प्रकारच्या शर्यती घेतल्या गेला. सर्व मुलांना रंगीत चेंडू बक्षीस म्हणून दिले.

**ज्यूनियर के.जी.** – धावणे, अडथळ्यांची शर्यत व हुलाहुप रिंग व टोपी घालून धावणे अशा शर्यती घेतल्या. सर्व मुलांना हॉकीची बॅट व चेंडू बक्षीस दिले.

**सिनीयर के. जी.** – धावणे, अडथळ्यांची शर्यत व तीन पायांची शर्यत असे क्रीडाप्रकार घेतले व गोष्टींची पुस्तके सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून दिली गेली.

**९ जानेवारी २०१९ – बाजारहाट**

सिनीयर के. जी. च्या मुलांना गणित विषयांतर्गत विविध नाणी व नोटा यांची ओळख तसेच बाजारातील खरेदी अशा विषयांची ओळख करून दिली जाते. याचाच एक भाग म्हणजे शाळेत साजरा होणारा 'बाजारहाट' हा उपक्रम. यात सिनीयरचे काही विद्यार्थी शिक्षकांसोबत दुकानदार होतात व नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरची इतर मुले गिऱ्हाईक बनून पालकांसोबत या बाजारहाटात खरेदीचा आनंद लुटतात. खाऊ व खेळणी खरेदी करण्याची मजा विद्यार्थी व पालकांनी घेतली.

**११ जानेवारी २०१९ – सहल**

नर्सरी, ज्यूनियर व सिनीयर के.जी.तील १८२ मुलांनी 'विष्णुजी की रसोई' येथे आयोजित केलेल्या सहलीत सहभाग घेतला. सकाळी ९.३० वाजता निघून सर्वच जण १०च्या सुमारास सहल स्थळी पोहोचले. छोटा भीम, डोरेमॉन या कार्टूनचे वेश परिधान केलेल्या

आमच्या चिमुरड्यांनी स्वागत केले. मुलांच्या खेळासाठी विविध खेळ, करमणुकीचे कार्यक्रम, जादूचे प्रयोग या सर्वांची सोय होती. इडली, चटणीचा नाश्ता करून मुले खेळायला गेली. दुपारी जेवताना पुरी, भाजी व श्रीखंडाच्या मेनूवर मुलांनी ताव मारला. निघताना फ्रुटी व केक खाऊन दमलेली चिमुकली दमून गेली होती.

**१४ जानेवारी – (नर्सरी) गाणी दिवस (बडबडगीते सादरीकरण)**

मुलांनी भाषेचे बंधन न ठेवता गाणी सादर करायची होती. मुलांनी विविध भाषांतून अभिनयासहित सादर केली.

१५ जानेवारी – ज्यूनियर +सिनीयर – गाणी दिवस (बडबडगीते) हिंदी, मराठी, गुजराथी व सिनीयरच्या एका मुलाने संस्कृतमध्ये गाणे सादर करून या दिवसाचा आनंद लुटला.

याच दिवशी संक्रांत सण सुद्धा साजरा केला गेला. या दिवसाचे महत्त्व देशात विविध प्रांतात अनेक नावांनी ओळखला व साजरा होणारा हा सण. त्याची पद्धत व महत्त्व शिक्षकांनी सांगितले. काळ्या रंगाचे कपडे घातलेले आमचे विद्यार्थी शिक्षकांनी दिलेला तिळगूळ आनंदाने खात घरी परतले.

**१८ जानेवारी – शाळेची तयारी**
**१६ जानेवारी – संत्र सोलणे** } **नर्सरी**

नर्सरीच्या मुलांसाठी या उपक्रमांचे आयोजन केले होते. ज्याचा उद्देश होता त्यांना स्वावलंबनाचे प्राथमिक शिक्षण देणे.

शाळेची तयारी – शाळेत जाताना मुलांनी साधे कपडे घातले होते. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली व मदतीने मुले शाळेचा गणवेश कसा घालायचा ते शिकली.

संत्र सोलणे – सर्व मुलांनी एक संत्र आणले होते. ते सोलण्याचे तंत्र शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवले.

**जानेवारी – मटार सोलणे**
**३० जानेवारी – फळांची** } **ज्यूनियर के. जी. (Fruits Chat)**

मुलांना विविध फळे, भाज्या यांची ओळख व त्यांच्याबद्दलची माहिती प्रकल्पाद्वारे शिकवली जाते. त्याचाच एक भाग म्हणून मटार सोलणे, विविध फळे कापून त्याची 'फ्रूट प्लेट' मुलांना दिली जाते. कामात पालकांना मदत करावी, तसेच भाज्या, फळांचे प्रत्यक्ष निरीक्षण व हाताळणी असे हेतू या उपक्रमांमुळे साध्य होतात.

**२१ जानेवारी – Rhymes Day** – ज्यूनियर व सिनीयर के. जी. मुलांना इंग्रजी भाषेतील एक राईम सादर करायची होती. काही मुलांनी अतिशय सुंदर पद्धतीने याचे सादरीकरण केले.

**२५ जानेवारी २०१९ –** २६ जानेवारीला साजरा केला जाणारा प्रजासत्ताक दिवस शाळेत २५ जानेवारीला साजरा झाला. नर्सरीच्या मुलांनी तिरंगी रंगाचे कपडे घालून झेंड्याची गाणी गायली.

ज्यूनियरच्या मुलांनी टोपीला तिरंगी रंगात रंगवली. झेंडा–गीतांमधून भारत देश व झेंडा याबद्दलचा आदर व्यक्त केला.

सिनीयरच्या मुलांनी फुलदाणी व फुलांना तिरंगी रंग दिले. शाळेच्या आवारात ढोलाच्या तालावर मुलांनी तालात संचलन करून झेंडा–गीते म्हणून 'जय हिंद' चा जयघोष केला.

**२८ जानेवारी २०१९ –** NKGSB बँकेतर्फे सिनीयर के. जी.च्या मुलांसाठी चित्र काढण्याचा उपक्रम राबवला गेला. 'फळांची टोपली' असा विषय मुलांना दिला होता. मुलांनी उत्तम चित्रे काढली. सर्वांनाच पेन, पेन्सिल, पट्टी असे बक्षीस दिले गेले.

---

जेव्हा बुद्धीवर कल्पनेचा पगडा बसतो, तेव्हा त्यात वेडसरपणाचा अंश आलाच म्हणून समजा. – सॅम्युअल जॉन्सन

**२९ जानेवारी २०१९ – गोष्ट दिवस**

ज्यूनियर व सिनीयरच्या मुलांसाठी हा दिवस गोष्ट सांगणे हा उपक्रम घेतला गेला. इंग्रजीतून गोष्ट सांगण्याचे हे आव्हान मुलांनी छान पेलले. हावभावासकट गोष्टी सांगून मुलांनी शिक्षकांना चकित केले.

**२१ जानेवारी ते २४ जानेवारी –** या दरम्यान NKGSB बँकेमध्ये सिनीयरच्या मुलांना नेण्यात आले. सार्वजनिक जागा व परिसर या प्रकल्पाअंतर्गत मुलांना बँकेत नेण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**IPM 2018 (मेगा फायनल) गणित परीक्षेचा निकाल :**

गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची नावे :

| इ. | विद्यार्थीचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| ६ वी | हर्षल पेडणेकर | ३२५ वा |
| ६ वी | निहारिका मोरे | ३५१ वा |
| ६ वी | ऋग्वेद खोळे | ४६७ वा |
| ७ वी | इशान फणसे | ४६ वा |
| ७ वी | प्रत्युष त्रिपाठी | ३४० वा |
| ७ वी | कुश दास्ताने | ३४३ वा |

**युनिफाईड आंतरराष्ट्रीय इंग्लिश ऑलिंपियाडचा निकाल :**

राष्ट्रीय स्तरावर क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे :

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| ६ वी | यश स्वार | १ ला |
| ६ वी | उमा करंदीकर | ५३ वा |
| ८ वी | मृण्मयी गांगल | ६४ वा |

**जिज्ञासा ट्रस्ट आयोजित नॅशनल चिल्ड्रन सायन्स काँग्रेसचा राष्ट्रीय स्तरावरचा निकाल :**

आमच्या विद्यार्थीनी कु. अवनी साठे व कु. रमा राईलकर यांनी "Conversion of Infertile Soil to fertile soil by using simple and natural resources" हा विज्ञान प्रकल्प भुवनेश्वर, ओरिसा येथे सादर केला. पाच अरब व दहा आशियाई देशाचे प्रकल्प होते. ९०० प्रकल्प सादर केले व त्यात आमच्या प्रकल्पाने 'ब' दर्जा मिळवला व तसेच सुवर्णपदक, प्रशस्तिपत्रक व मानचिन्ह मिळाले.

**संस्कृती कला दर्पण संस्थेतर्फे आयोजित आंतरशालेय नाट्य स्पर्धेचा निकाल :**

आमच्या विद्यार्थ्यांनी 'फुलराणी की रणरागिणी' हे नाटक सादर केले व खालील पारितोषिके मिळवली.

उत्कृष्ट नाटक – प्रथम क्रमांक

उत्कृष्ट अभिनेत्री – कु. कृपा झुंजारराव

**मराठी ग्रंथ संग्रहालय व ग्रंथाली वाचक चळवळ या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने**

**'बालवाचक दिन' स्पर्धेचा निकाल :**

कृपा झुंजारराव – प्रथम क्रमांक

सौम्या मराठे – उत्तेजनार्थ

**इंद्रधनु व जिज्ञासा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने भरवलेल्या 'वर्षांचा आदर्श विद्यार्थी' या स्पर्धेचा निकाल:**

इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध पातळ्यांवर या स्पर्धेत भाग घेतला :

१) कु. यतीश वैद्य याला १० जणांच्या अंतिम स्पर्धेत स्थान मिळाले.

२) कु. श्रेया मोघे हिला 'सर्वोत्तम निबंध' पारितोषिक मिळाले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

### शिस्तबद्ध खेळातूनच यशाचा राजमार्ग जातो: मधुरिका पाटकर

महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाचा खेलोत्सव: वार्षिक बक्षीस वितरण कार्यक्रम दि. २५ जानेवारी २०१९ रोजी संपन्न झाला. क्रीडा विभागाचे समन्वयक



डॉ. महेश पाटील यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वर्षभरात वेगवेगळ्या राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळवलेल्या पुरस्कारांचा धावता आढावा घेतला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या मधुरिका पाटकर उपस्थित होत्या. ठाणे जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनचे मिलन वैद्य हे देखील आवर्जून उपस्थित होते. क्रीडा विभागातील सौ. रोहिणी डोंबे उपस्थित होत्या.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉ. नाईक म्हणाल्या की, 'कॉलेज व विद्यार्थ्यांचे नाते हे झाड आणि पक्षी यांच्या नात्यासारखं असतं. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील महाविद्यालयाच्या स्थानाबद्दल नेहमी संवेदनशील असलं पाहिजे.'

'आपणाला आकाशात तारे दिसतात पण त्या ताऱ्याच्या निर्मिती मागची प्रक्रिया लक्षात घेतली पाहिजे. नम्रता हा आपल्या चारित्र्याचा गाभा असला पाहिजे' असं सांगत United we stand, Divided we fall असा मोलाचा सल्ला दिला. 'हरन्यात खरोखर जग जगते' या कवितेच्या ओळीचा दाखला देताना डॉ. नाईक म्हणाल्या की, अपयशातून यशाची वाटचाल करायला हवी. याप्रसंगी प्रा. यतीन पंडित यांनी मधुरिका पाटकर यांची मुलाखत घेतली. टेबल टेनिस या खेळात २०१७ साली राष्ट्रीय पातळीवर प्रथम क्रमांक मिळवला. मधुरिका पाटकर यांनी २०१८ मध्ये राष्ट्रकुल क्रीडास्पर्धामध्ये टेबल टेनिस मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकावलं. ते पदक स्वीकारताना भारताच्या राष्ट्रगीताची धून वाजवली तेंव्हा आपला ऊर भरून आला असं त्या म्हणाल्या. राज्यवर्धन सिंह राठोड यांच्या भारत सरकारच्या क्रीडामंत्री पदी नियुक्ती नंतर देशातील क्रीडाक्षेत्रात सकारात्मक बदल होत आहे. मोदी सरकारच्या खेलो इंडिया योजनेतून क्रीडा संस्कृती विकसित होत असून या क्षेत्रात करियरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमात विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम



२ फेब्रुवारी २०१९ रोजी जोशी–बेडेकर महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष महाविद्यालयाच्या भव्य अशा पटांगणात साजरे करण्यात आले. 'सर्ज' या माजी

विद्यार्थ्यांच्या संघटनेने हा कार्यक्रम आयोजित केलेला असून डॉ. माधवी नाईक या त्या संघटनेच्या अध्यक्षा आहेत. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आयुष्याचा कायदा म्हणजे आपले वागणं असतं असे उद्‌गार काढले. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. तसेच ऑस्कर पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध अभिनेते, लेखक, दिग्दर्शक अरुण नलावडे यांनी या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांची भूमिका बजावली.

'दिवाने मिलते गए और कारवाँ बनता गया' या ओळीद्वारे प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी त्यांचा महाविद्यालयातील आतापर्यंतचा प्रवास उलगडला. आपल्या नात्यातला असलेला संवाद टिकून ठेवा असं सांगत सामाजिक भान देखील तितकंच महत्त्वाचं असा मूलमंत्र त्यांनी दिला.

मेनका ट्रॉफी प्राप्त माजी विद्यार्थिनी निधी प्रभू यांच्या भारावून टाकणाऱ्या 'शिवस्तुती' या नृत्याद्वारे सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. 'पन्नाशीची उमर गाठली' हा प्रवास थोडक्यात पण सुंदररित्या एका चित्रफितीतून सादर करण्यात आला. 'विद्या प्रसारक मंडळ' या संस्थेचे संस्थापक डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या स्थापनेमागील उद्देश अगदी चमकत होता. अभिनेत्री संपदा जोगळेकर- कुलकर्णी यांनी अत्यंत थोडक्यात 'गुरू म्हणजे ज्या वास्तूत, ज्या व्यक्तींमुळे आपल्याला सकारात्मक वाटतं' अशी व्याख्या रसिक प्रेक्षकांसमोर मांडली. माजी विद्यार्थ्यांबरोबरच आजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी जोशी-बेडेकर महाविद्यालयाचा उत्साह दर्शविला.

निधी प्रभू, स्वाती सुर्वे-कोल्हे आणि पल्लवी लेले या माजी विद्यार्थिनींनी आपल्या नृत्याने सर्व प्रेक्षकांना भारावून टाकले. तसेच जुन्या काळापासून ते आताच्या काळापर्यंतच्या प्रेमाचा उलगडा निनाद आजगांवकर, शशांक निमकर, प्रिती निमकर, मृदुला दाढे-जोशी, ऋषिकेश अशा नामवंतांनी आपल्या गीतांतून सादर केली. सुभाष मालेगांवकर या संगीत संयोजकांनी आपल्या वादनातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची सांगता शशांक-ऋषिकेष यांच्या 'यह दोस्ती हम नहीं तोडेंगे' या गीताद्वारे झाली. कार्यक्रमाच्या अंतिमतः प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी सर्व कलाकारांचे, निवेदकांचे व आयोजकांचे पुस्तक देऊन कौतुक केले. तसेच पुढची ५० वर्षेदेखील ही वास्तू अशीच भक्कम व कार्यरत राहील असा विश्वास सर्वच उपस्थितांनी दर्शवला.

'तारका मालिकांमध्ये जसा ध्रुव तारा अढळ आहे, त्याचप्रमाणे जोशी-बेडेकर महाविद्यालय हे ठाणे जिल्ह्यातील एक नामवंत शिक्षण वास्तू राहील', हेच कार्यक्रमाच्या अंताला दिसून येत होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### बांदोडकरच्या राष्ट्रीय सेवा योजना व छात्र सेनेचे संयुक्त निवासी शिबिर विक्रमगडमध्ये संपन्न

मुंबई विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना (NSS) तसेच राष्ट्रीय छात्र सेना (NCC) यांचे एक गाव दत्तक योजने अंतर्गत ७ दिवसांचे निवासी शिबिर विक्रमगड येथे माण आश्रम शाळेत दि.२६ डिसेंबर २०१८ ते ०१ जानेवारी २०१९ या कालावधीत नुकतेच संपन्न झाले.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू असून NSS व NCC ला एकत्र येऊन Adopted Village ची संकल्पना राबविण्यासाठी विक्रमगड येथील माण आश्रम शाळेची व तेथील माणगावाची निवड झाली आणि शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक, श्रमिक व सामुदायिक भावनेतून माण गावात व आश्रमशाळेत

विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये तेथील आरोग्य शिबिर, नेत्रचिकित्सा शिबिर, संपूर्ण स्वास्थ्य शिबिर, त्वचा तपासणी शिबिरही आयोजित करण्यात आली. तसेच माण आश्रम शाळेतील नववी व दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या गणित व विज्ञान विषयांच्या ज्या सामान्यपणे समस्या आहेत त्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिबिरादरम्यान तेथील विद्यार्थ्यांशी समोरासमोर संवाद साधून आपल्या परीने निरसन केले व दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये हमखास यश कसे मिळविता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच सामाजिकतेच्या भावनेतून माणगावात सार्वजनिक स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामस्वच्छता, एक गाव एक उकीरडा, रस्ते, शौचालये, सार्वजनिक स्वच्छता, कुपोषित बालकांचा प्रश्न, शेवग्यांच्या सालांची लागवड, पाणी वाचवा मोहीम व वृक्षसंवर्धन इत्यादी प्रश्नांना कधी पथनाट्यद्वारा तर कधी प्रत्यक्ष कृतीतून व उपक्रमांचे आयोजन करून या आदिवासी पाड्यातील गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. यामध्ये NSS Volunteers आणि I MAH NCC Army बटालियनचे NCC Cadets यांनी उत्साहाने आपापली कामगिरी पार पाडली.

सात दिवसांच्या या निवासी शिबिरात व्याख्यानासाठी विविध क्षेत्रांतील व्याख्यात्यांना निमंत्रित करण्यात आले. त्यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राजेंद्र कोळी यांनी आदिवासीपाड्यांमध्ये व ग्रामीण जनतेत असलेल्या अंधश्रद्धांचे निरसन होण्यासाठी विविध प्रात्यक्षिकांद्वारे विज्ञानवादी दृष्टीकोनाची कास धरल्यास कशाप्रकारे चांगले जीवन जगता येते हे पटवून दिले. तसेच शिवव्याख्याने श्री. नवनीत यशवंत यांचे श्री शिवाजी महाराज व श्री संभाजी महाराज यांच्या जीवनपटातून नवयुवकांना प्रेरणादायी व दिशादर्शक असे व्याख्यान आयोजित करून Volunteers व Cadets आणि आश्रमातील विद्यार्थ्यांमध्ये देशभिमान व Leadenship Quality वाढीस लागावी म्हणून उत्तेजना मिळाली.

त्याचप्रमाणे साहित्य, काव्य व कलेची आवड जोपासणाऱ्यांसाठी एका युवक कवी संमेलनाचेही आयोजन या शिबिरात करण्यात आले. यामध्ये कवी अच्युत इपारे, अक्षय पाटील, जितेंद्र व राज या नवकवींचा समावेश होता. तसेच भारूड या कलेतून व्यसनमुक्ती साठी ही गाणी आणि लोकगीते या माध्यमातून एक चळवळयुक्त व्याख्यानाचेही आयोजन रामकृष्ण डीग्रजकर यांच्या द्वारे करण्यात आले. श्री. डीग्रजकरांनी आपल्या मधुर गळ्यातून गाण्यांद्वारे व भारूडातून व्यसनांपासून स्वतःला कसे दूर ठेवावे हे सांगितले.

त्याचप्रमाणे NSS सोबत हा NCC चाही Adopted Village च्या अंतर्गत कॅम्प असल्यामुळे I MAH NCC BN BHM किशोर सोनावणे व पॅरा फोर्सचे हवालदार श्री. देवेंद्र सिंग यांनी प्रत्यक्ष भेट देऊन Raw व Intelligence यावर एक तोंडओळख करणारे व्याख्यान दिले व माण गावात स्वच्छ भारत अभियान व पदनाट्याद्वारे जनजागृती करणाऱ्या उपक्रमात सहभागी होऊन तेथील पाडे व गावकऱ्यांशी संवाद साधला.

या निवासी शिबिरादरम्यान तेथील विद्यार्थ्यांकरिता आरोग्य शिबिरे, विविध स्पर्धा जसे कविता वाचन, निबंध, चित्रकला, रांगोळी, नृत्य, समुहनृत्य, खेळ इत्यादींच्यामार्फत स्पर्धा आयोजित करून त्यांना विद्यार्थ्यांनी विविध पारिताषिके देऊन गौरव केला.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी शिबिरास भेट देऊन येथील शिबिरार्थींना आपल्या अभ्यासपूर्ण व ओघवत्याशैलीने प्रबोधित केले व शिबिराच्या शुभेच्छेसह मार्गदर्शन व वृक्षलागवडीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.या शिबिरात NSS चे १५० व NCC चे ४० असे १९० विद्यार्थी

सहभागी झाले होते व कार्यक्रम अधिकारी प्रा. भालचंद्र मांडलेकर व प्रा.अजित भूमकर यांच्याबरोबर NCC ARMY WING चे लेफ्टनंट बिपीन धुमाळे हे पूर्णवेळ शिबिराच्या आयोजनामध्ये सहभागी होते.

उपप्राचार्य प्रा. वेंकटरमण सरांसह सर्व शिक्षक आणि प्राध्यापक यांनी ७ दिवसांमध्ये आपापल्यापरिने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आश्रमशाळेचे मुख्याध्यापक श्री.वानास सर यांनीही हे शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. तसेच NSS चे विद्यार्थी प्रमुख यश मोटे व अपराजिता कनौजिया व NCC चे ऋषिकेश ढाणे व शुभम निळकंठ यांनीही सर्व फ्रंटवर धुरा सांभाळून हे शिबिर यशस्वी केले.

**International conference on Ecology Ethology and Environment Management 11 & 12 January 2019**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना. बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागातर्फे International conference on Ecology Ethology and Environment Management या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद ११ व १२ जानेवारी २०१९ रोजी होप नेचर ट्रस्ट, अंबा गोपाल फाऊंडेशन व सेसकॅप (SEESCAP) यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाली.

या परिषदेचे उद्घाटन डॉ. शशीकुमार मेनन, एफ. डि. ऐ. तज्ज्ञ व जयंत कयाळ सदस्य विद्या प्रसारक मंडऴ ठाणे यांच्या हस्ते झाले. या परिषदेमध्ये १३ प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली. व डॉ. शशीकुमार मेनन यांनी Case Study on Conservation of Species & behavioural Ecology या विषयावर बीजभाषण केले. त्यांनी पक्षी स्थलांतरीत होताना त्यांच्या खाण्याच्या सवयीतील बदल, एफटीए कार्ड टेक्नोलॉजी फॉर डिएनए सॅम्पलिंग यावर प्रकाश टाकला.

या परिषदेत हिमालयातील जैवविविधता ग्लोबल वॉर्मिंगचे अंटार्टिकावर होणारे परिणाम, सकस जीवनशैलीचे महत्त्व, प्राणी व वनस्पती यांची सह उत्क्रांती, पाणथळ जमिनीचे संवर्धन, ध्वनी प्रदूषणाचे परिणाम रोखण्याकरता असणाऱ्या कायद्याच्या बाबी, लक्षद्वीप, अंदमान व निकोबार येथील सागरी विविधता इत्यादी विविध विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने संपन्न झाली. प्राण्यांचे पुर्नवसन करणाऱ्या केंद्राच्या श्री. व सौ. सोनावणे यांची मुलाखतदेखील या वेळी घेण्यात आली.

या परिषदेत शास्त्रज्ञांच्या मांदीयाळीत उपस्थित प्रत्येकाला पर्यावरण व्यवस्थापनाकरता नवीन गोष्ट करण्याची प्रेरणा मिळाली. बांदोडकर महाविद्यालय आपले ब्रीद वाक्य सार्थ करत तरुण पिढीला प्रोत्साहन देऊन पर्यावरण रक्षणाकरता काम करायला उत्तेजन देत आहेत. या परिषदांच्या आयोजनामध्ये हाच हेतू असल्याचे प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी नमूद केले. या परिषदेला भारताच्या विविध राज्यातील संशोधकांनी आपला सहभाग नोंदवला.

बांदोडकरचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा माजी विद्यार्थी व ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्या अध्यक्षेत संपन्न.

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आणि आपल्या महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ हा आपल्या माजी विद्यार्थी असणाऱ्या व सद्यपरिस्थितीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली व्हावा ही परंपरा. गेल्यावर्षी प्रमुख पाहुणे होते माजी विद्यार्थी व भारताचे एअर व्हायस मार्शल. सुनील नानोदकर व यावर्षी सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना प्रमुख पाहुणे म्हणून लाभले ते नवनिर्वाचित ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर. यावर्षीचा

हा दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी आपापल्या विषयांत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्य संपादन करीत आहेत. दरवर्षी त्यांचा या वार्षिक समारंभात यथोचित गौरव आपल्याच माजी विद्यार्थ्यांकडून होत असतो. त्याचप्रमाणे प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांच्या निमंत्रणाचा मान राखून व आपल्या व्यस्त व्यापातून वेळ काढून जिल्हाधिकारी व मुख्य निवडणूक अधिकारी श्री. राजेश नार्वेकर यांनी येण्याची तयारी दर्शविली आणि जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. क्रीडा, साहित्य, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना संशोधन अशा विविध प्रकारांत विशेष व राष्ट्रीय स्तरांवरील पारितोषिके यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. प्रत्येकाला दुसरी संधी ही मिळतेच असे नाही. मला मात्र ही दुसरी संधी मिळाली व मी त्या दुसऱ्या संधीचा पुरेपूर फायदा घेतला. परंतु पहिल्या मिळालेल्या संधीचेच जर सोने केले तर आपला वेळ, श्रम व भरकटलेपणाही वाचतो  असा संदेश त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. तुम्हाला इतक्या उत्कृष्ट महाविद्यालयात प्रवेश मिळाला आहे, इथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते याचा फायदा घेऊन सर्वांनी आपली प्रगती करून घ्यावी असा मोलाचा संदेशही त्यांनी दिला. यावेळी डॉ. आघारकर, उपप्राचार्य वेंकटरमण, उपप्रचार्य श्री. राजेश लेले इत्यादी मान्यवर शिक्षकशिक्षकेतर सहकारी व ३०० विद्यार्थी असा श्रोतृवर्ग उपस्थित होता. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

**Two Days National Symposium on Educational Ethics and Ethics in Research**

वि. प्र. मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या Internal quality Assurance Cell यांच्यातर्फे एज्युकेशनल एथीक्स अँन्ड एथीक्स इन रिसर्च (Educational Ethics and Ethics in Research) या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या चर्चासत्राचे उदघाटन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले की मूल्ये ही आपली नैतिक जवाबदारी आहे. विद्यार्थी दशेत महाविद्यालयाने नमूद केलेल्या नियमांचे पालन करणे हे देखील एक मूल्य आहे.

डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, डायरेक्टर जनरल, डॉ. बेडेकर व्यवस्थापन संस्था यांनी Research Ethics, Leadership and World class Education in Higher Education Institution in India या विषयावर बीजभाषण केले. संशोधन करत असताना मूल्ये जपणे ही फार महत्त्वाची बाब आहे.

डॉ. हरीश शेट्टी यांनी बिल्डिंग इमोशनल वेल्थ अँन्ड ईक्यालिटी (Building emotional wealth and equity) हा अतिशय गुंतागुंतीचा विषय खेळीमेळीच्या पद्धतीने सर्वांना समजावून सांगितला. या चर्चासत्रामध्ये डॉ. डी. के. नायक, प्राचार्य, वि.प्र.मं.चे तंत्रनिकेतन, डॉ. नीतिन जोशी, संचालक, डॉ. वा.ना. बेडेकर व्यवस्थापन संस्था, डॉ. माधुरी पेजावर प्राचार्या, वि.प्र.मं.चे बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आणि सौ. श्रीविद्या जयकुमार, प्राचार्या, टी.एम.सी लॉ कॉलेज यांनी शिक्षण, प्रोफेशन, व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात कशा प्रकारे मूल्ये जपली पाहिजेत याबाबत मार्गदर्शन केले.

या चर्चासत्राच्या सांगता समारंभाला डॉ. अरविंद नातू,  IISER, पुणे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ.नातू यांनी Scientific Misconduct या विषयावर आपले विचार माडले. संशोधन करताना कोणत्या गोष्टी

आवर्जून करू नयेत यावर प्रकाश टाकला.

या चर्चासत्रामध्ये एकूण ८ संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. या चर्चासत्राला ७५ शिक्षक, ५२ विद्यार्थी, ५८ शिक्षकेतर सहकारी व ८ बाहेरील महाविद्यालयातील संशोधक उपस्थित होते.

अशा उपक्रमांच्या माध्यमातून वि.प्र.मं.चे बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालय नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे कार्य करीत आहे. या चर्चासत्रामध्ये शिक्षण, व्यवस्थापन क्षेत्र, संशोधन क्षेत्रामध्ये मूल्ये जपण्याच्या दृष्टीने कशी काळजी घ्यावी याबाबत सर्वांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

**सावित्रीबाई फुले जयंती तसेच जिजाऊ माँसाहेब जयंती उत्साहात साजरी**

दि.३ जानेवारी २०१९ रोजी सावित्रीबाई फुले जयंती तसेच दि.१२ जानेवारी २०१९ रोजी जिजाऊ मॉसाहेब जयंती निमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सावित्रीबाई फुले तसेच जिजाऊ माँसाहेब यांच्या माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

तसेच सावित्रीबाई फुले व जिजाऊ मॉसाहेब यांच्या प्रतिमेस प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की. स्त्री शिक्षण सुरू होण्यासाठी त्यावेळी साचित्रीबाई फुले यांनी खाल्लेल्या खस्तांमुळे आज २१ व्या शतकात अनेक स्त्रिया या उत्तुंग भरारी घेत आहेत.त्यांच्या या कार्याचे समस्त स्त्री वर्ग ऋणी राहील. तसेच जिजाऊ माँसाहेब यांनी त्यांच्या मुलावर म्हणजे शिवाजी महाराजांवर जसे संस्कार केले तसे संस्कार प्रत्येक स्त्रीने आपल्या मुलावर केले पाहिजेत तरच असे शिवाजी जन्माला येतील व आपल्या देशाचे भविष्य उज्ज्वल करतील.

महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी सावित्रीबाई फुले व जिजाऊ माँसाहेब यांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

ग्रंथालय व कार्यालयीन कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर सहकारी आणि विद्यार्थी यांनी सावित्रीबाई फुले तसेच जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

**नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी**

दि.२३ जानेवारी २०१९ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस सौ. शहा मॅडम यांनी पुष्पहार अर्पण केला व त्यांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

ग्रंथालय व कार्यालयीन कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर सहकारी आणि विद्यार्थी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

• तिसऱ्या व पाचव्या सत्रातील विद्यापीठ परीक्षा २ जानेवारी ते ११ जानेवारी, २०१९ दरम्यान पार पडल्या.

• दि. ११ जानेवारी रोजी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी भाईंदर येथे रिना मेहता, कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यासक्रम महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये 'लॉ ॲण्ड जेंडर सेसिटायजेशन इन इंडिया–माईंडसेट

प्रीपेरनेस फॉर अ जस्ट सोशल ऑर्डर' ह्या विषयावर पेपर सादर केला.

• दिनांक १२ जानेवारी, २०१९ रोजी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी विद्या प्रसारक मंडळाचे बा. ना. बांदोडकर, ठाणे यांच्याद्वारे आयोजित करण्यात आलेल्या जागतिक परिषदेत 'अ कंम्लीशमेन्ट ऑफ सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट फॉर ग्रीन अर्थ – अ स्टडी ऑफ द रोल ऑफ लॉ' विषयावर पेपर सादर केला.

• ARA पडताळणी : ॲडमिशन रेग्युलेटरी ॲथोरिटी यांच्या तर्फे दिनांक १ जानेवारी रोजी श्रीमती देशमुख ह्यांना प्रथम वर्षे विधीच्या प्रवेशांबाबत पडताळणी करिता पाठविण्यात आले होते. ही तपासणी शासनाच्या वतीने पार पडली.

• विधी फाऊंडेशन प्रभाकर हेगडे व्याख्यानमाला

विधी फाऊंडेशन ठाणे व विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालय यांनी एकत्रितपणे दिनांक १३ जानेवारी, २०१९ रोजी मनु सभागृहात प्रभाकर हेगडे व्याख्यानमाला आयोजित केली होती. प्रेक्षक वर्गातील वकिलांना आणि भविष्यातील वकिलांना प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व असलेल्या दोन अधिवक्त्यांकडून व्याख्यान देण्यात आले. आनंद विश्वगुरुकुल आणि एम. एस. विधी महाविद्यालयातील विद्यार्थीसुद्धा उपस्थित होते.

वरिष्ठ वकील राजीव चव्हाण (मुंबई उच्च न्यायालय) 'लेसनन्स फॉर यंग लॉयरस' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. रश्मी ओझा यांनी 'ह्यूमन राईटस इन इंडिया : लॉ ॲण्ड प्रॅक्टीस' या विषयावर व्याख्यान दिले.




**वरिष्ठ वकील राजीव चव्हाण (मुंबई उच्च न्यायालय)**




**मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाच्या प्राध्यापिका डॉ. रश्मी ओझा**

कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता सुरू झाला. लॉचे विद्यार्थ्यांसह ठाणे बारमधील वकिलांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांचे प्रश्न शांतपणे ऐकून त्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वकिली व्यावसायासाठी विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन मिळाले.

श्री. वेद पाठक (बेडेकर विद्या मंदिराचे माजी विद्यार्थी) व श्री. बालन ह्या दोन ज्येष्ठ वकिलांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रमोद पाटील (महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष), ठाणे बार असोशिएशनचे

अध्यक्ष प्रकाश भोसले, श्री. भाटिया, श्रीमती सुनिता कापरेकर इ. ह्यांसारख्या वरिष्ठ वकिलांनी सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती नोंदवली.

एक उदयोन्मुख वकील पुरस्कार देण्यात आला. आमच्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष प्रात्यक्षिक टॉपर कुमारी मोमिन सारा हिला तरुण विद्यार्थी वकील पुरस्काराने सन्मानित केले.

विधी ह्या विषयांत डॉक्टरेट पदवी संपादन केल्याबद्दल डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार, डॉ. श्रीमती अश्विनी अविनाश नाईक व डॉ. श्री. त्रिभुवन प्रसन्नजीत ह्यांना गौरवण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षपद सन्मानीय जिल्हा व सत्र न्यायालय श्री. पटवर्धन ह्यांनी भूषविले. विधी फाऊंडेशनची स्थापना आमच्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांद्वारे करण्यात आली आहे.

• प्रथम सत्र परीक्षेकरिता पूर्व परीक्षा दिनांक १६ व १७ जानेवारी रोजी घेण्यात आली. ह्यात अभ्यासाची उजळणी घेण्यासोबतच मुलांना योग्य उत्तराची मांडणी कशाप्रकारे करावी ह्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

• वर्गाची सुरुवात : चौथ्या व सहाव्या सत्रातीत वर्गांची सुरुवात दिनांक १८ जानेवारी २०१९ पासून करण्यात आली.

• आयुक्तांसमवेत सभा : दि.१९ जानेवारी २०१९ रोजी ठाण्यातील आयुक्तालय कार्यालयातर्फे शिष्यवृत्तीचे फॉर्म भरण्याच्या संबंधातील माहिती देण्यासाठी सभा बोलावण्यात आली.

• करिअर डेव्हलपमेन्ट वर्कशॉप : महाविद्यालयातर्फे दि.२४ जानेवारी २०१९ रोजी सायंकाळी ६.०० वाजता 'तरुणांसाठी राजकरणातील संधी' ह्या वर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. रिसोर्स व्यक्ती म्हणून श्री. एम. आय. टी. स्कूल ऑफ गव्हर्नमेन्ट ह्यांना बोलावण्यात आले होते.



• अनफेअर मिन्स कमिटी : अनफेअर मिन्स कमिटीची बैठक दिनांक २५ जानेवारी २०१९ रोजी दुपारी २ वाजता घेण्यात आली. कुमारी अमृता माहीमकर हिच्या केसवर चौकशी आणि निर्णय झाले.

• विद्यार्थी परिषद : दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजी विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात आली. ती खालीलप्रमाणे –

डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार – अध्यक्ष

प्राध्यापक श्री. विनोद ह. वाघ – शिक्षक प्रतिनिधी

अंकित धिंडाळे – सरचिटणीस

श्याम ठाकूर – सांस्कृतिक प्रतिनिधी

एन. बालाजी – तिसऱ्या वर्षाचे प्रतिनिधी

नीती पिल्लई – दुसऱ्या वर्षाचे प्रतिनिधी

मुल्ला बिस्मा – प्रथम वर्षाचे प्रतिनिधी

• आमचा विद्यार्थी रवी सोपान देशमुख ह्याने दिनांक १८ मे २० जानेवारी दरम्यान एम आय टी वर्ल्डपीस युनिव्हर्सिटी, पुणे ह्यांच्या द्वारे पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या नवव्या भारतीय छात्र संसदेत सहभाग घेतला.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### डॉ. व्ही. एन. बेडेकर जन्मशताब्दी वर्ष व्याख्यान मालिका: सौ. आनंदी रविनाथ यांचे व्याख्यान

दि.४ ऑगस्ट २०१८ रोजी ९.०० वाजता सकाळी व्ही.पी. एम पॉलिटेक्निकच्या A.V. ROOM मध्ये सौ. आनंदी रविनाथ (लॅब मॅनेजर, सिल्सीस लॅब प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई) यांचे (Impact of meditation on the human genome) विषयावर भाषण आयोजित केले होते. व्ही.पी.एम.चा सर्व स्टाफ या कार्यक्रमाला उपस्थित होता.

जीवनाच्या प्रवासात प्रत्येकाला संघर्ष करावा लागतो. पण त्या प्रवासात जर चमत्कार घडला तर तो प्रवास आल्हाददायी वाटतो. पूर्वकालीन वेद आणि उपनिषदांमुळे ऋषीमुनींवर दैवीकृपा झाली होती. तशीच आताच्या युगात meditation आपल्या जीवनावर असाच सकारात्मक प्रभाव घडविण्यास मदत करतो व जीवन सुसह्य करतो. आय.आय.टी. च्या Biotechnology विभागातून M.Tech केलेल्या आनंदी मॅडमने आपल्या जीवनाच्या प्रवासाची सांगड Meditation ने कशी घातली हे सांगितले.

### डॉ. पुष्पलता ठुमरे यांचे व्याख्यान

दि. ६ ऑक्टोंबर २०१८ रोजी ९ वाजता सकाळी व्ही.पी.एम. पॉलिटेक्निकच्या A.V. ROOM मध्ये डॉ. पुष्पलता ठुमरे यांचे salt its effect on helth या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. बाजारात आलेले विविध मिठाचे प्रकार आपल्या आरोग्यावर कसे परिणाम करतात या विषयी त्यांनी वेगवेगळी उदाहरणे देऊन सांगितले. श्रोत्यांच्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली व मिठाच्या वापराबाबत जागरुकता आणली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

४ - ६ जानेवारी : डॉ. पल्लवी आणि डॉ. मीनाक्षी, आयआयएम अहमदाबाद येथे आयोजित केलेल्या, भारतातील व्यवस्थापन संशोधन : संधी आणि आव्हाने आणि पेपर डेव्हलपमेंट वर्कशॉप या विषयाच्या कार्यशाळेला उपस्थित राहिल्या.





८ जानेवारी : एमएचआरडी इनोव्हेशन सेल द्वारा आयोजित महिंद्रा ग्रुपचे चेअरमन आनंद महिंद्रा यांच्या अध्यक्षतेखाली भारताच्या पहिल्या लीडरशीप टॉक चे थेट प्रक्षेपण शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे पहिले.

डॉ. स्मिता यांचा स्टडी ऑफ राइजिंग बेंचमार्क टेन - इयर बॉण्ड यिल्ड अँड इट्स इम्पॅक्ट ऑन द इंडियन इकॉनॉमी हा शोध-निबंध यूजीसी मान्यता प्राप्त जर्नल ऑफ मॅनेजमेंट (जेओएम) आयएसएसएन प्रींट: २३४७-३९४० या रिसर्च जर्नल मध्ये प्रकाशित झाला.

१० जानेवारी : डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (ब्रीम्स) आणि उद्योग अनुभव प्रतिष्ठान तर्फे 'नोकऱ्या मागू नका. नोकरी देणारे व्हा.' या विषय सूत्रावर आधारित प्रत्यक्ष उद्योजकांशी संवाद साधण्याची संधी देणाऱ्या टॉक शो चे आयोजन.



१६ - ३१ जानेवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी पितांबरी ग्रुप उद्योग येथे नेतृत्व या विषयावर सहा व्याख्याने दिली.

१७ जानेवारी : श्री. संजय सपकाळ यांनी वित्त विषयाच्या शिक्षकांसाठी एसीई इक्विटी या डेटाबेसचे प्रात्यक्षिक व्याख्यान आयोजित केले.

१८ जानेवारी : डॉ. स्मिता आणि प्रा. विभूती यांनी पितांबरी प्रोडक्ट्स प्रा. लि.च्या व्यवस्थापन विकास कार्यक्रमाच्या ४ थ्या तुकडीच्या पदविका प्रदान कार्यक्रमाचे आयोजन केले.



डॉ. सुखदा यांनी एमएमएस च्या विद्यार्थ्यांसाठी अंबिका योग कुटीर यांच्या सहकार्याने योग सत्राचे आयोजन केले.

डॉ. पल्लवी आणि डॉ सुखदा यांनी सांताक्रुझ येथे मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या मेजर्स फॉर क्वालिटी एनरिचमेण्ट अँड ससटेनन्स इन हायर एज्युकेशन इन्स्टिट्यूशन या विषयावरील एका दिवसाच्या एन ए ए सी परिसंवादात भाग घेतला.

२२ जानेवारी : प्रा. महेश भानुशाली यांनी कुर्ला येथील भारतीय पोस्ट ऑफिससाठी सेल्स मॅनेजमेंट या विषयावर वर तसेच डॉ. स्मिता जपे यांनी पोस्ट ऑफिस कर्मचाऱ्यांसाठी, व्यवस्थापन विकास कार्यक्रम (एमडीपी) सत्राचे आयोजन केले. पोस्ट ऑफिसच्या व्यवस्थापकांनी या परस्परसंवादी सत्राचे अत्यंत कौतुक केले.



२३ जानेवारी: प्रा. विभूती यांनी व्हीईएसएम बिझिनेस स्कूल, मुंबईच्या ऑपरेशन्स आणि एससीएमचे असोसिएट डीन ) श्री. सी जी प्रकाश, यांचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट मेड ईझी या विषया वरील अतिथी व्याख्यान आयोजित केले.

२३ -२५ जानेवारी: संजय सपकाळ यांनी इन्फोमॅटिक्स आणि कोचीन विद्यापीठ विज्ञान व तंत्रज्ञान तर्फे संयुक्तपणे, कोचीन येथे आयोजित केलेल्या लाइब्ररी टेक्नोलॉजी कॉन्व्हक्लेव २०१९ (एलटीसी २०१९) या तीन दिवसांच्या परिषदेत भाग घेतला.

२५ जानेवारी: डॉ सुखदा यांनी ग्रेट ट्रेनिंग आणि सर्व्हिस चा कर्मचारी विकास कार्यक्रम आयोजित केला.

२४ जानेवारी: सहार, मुंबई येथील हयात रीजेंसी हॉटेलमध्ये आयोजित सीएआय डिबेट कॉम्पटिशन २०१९ मध्ये ब्रीम्सचे दोन विद्यार्थी साहील काटकर आणि सुबोध डोंगरे उपांत्य फेरीत पोहोचले.




२५ जानेवारी: ब्रीम्सचे विद्यार्थी राज दळवी आणि निष्ठा ठाकूर व प्रा. शेखर वेलगलेती, मुंबईच्या बीकेसी, हॉटेल ट्रायडेंट येथे बीएमए १० एक्स स्केल अप कॉन्क्लेव्ह या कार्यक्रमाला उपस्थित राहिले.




३० जानेवारी: ब्रीम्सच्या विद्यार्थी व शिक्षकांसाठी 'परीक्षा पे चर्चा २.०' या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले.

डॉ. व्ही. एन. ब्रीम्स संस्थेला 'हायर एजुकेशन रिव्हू' या नियतकालिका तर्फे 'मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ द ईयर' म्हणून मानांकीत करण्यात आले.

•••

(पृष्ठ क्र.६ वरून- **मुक्ती व वेड**)

आणि भक्त तेही तसेच (वेडे). इथं गेलात की सगळ्या लोकांचा एकमेकांना पहिला प्रश्न असतो 'झालं का दर्शन? आणि जास्त दिवस राहिल्यास किती वेळा घेतलं दर्शन?' काही काही जण ४-४, ५-५ वेळा दर्शन घेतात. नाही जमल्यास एक मुखदर्शन व एक चरणदर्शन तरी हमखासच. कारण तो आहेच तसा-

**रुप पाहता लोचनी। सुख झाले वो साजनी।**
**तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा।**
**खरंच वेड लागाव तर ते असं, येणेची शरीरे।**
**शरीरा येणे सरे। किंबहुना येरझारे। चिरा पडे।।**

अशा या नादावणाऱ्या वेड्या देव-भक्तांच्या चरणी लिहिणाऱ्या वेडीचा शिरसाष्टांग दंडवत.

**- सौ. भाग्यश्री दत्तात्रय कुलकर्णी**

•••

(पृष्ठ क्र.८ वरून- **राष्ट्रीय दिनदर्शिका आणि पारंपरिक पंचांग**)

घटकांमध्ये अनुक्रमे सुमारे ७२ वर्षांनी १ दिवस, ९६० वर्षांनी १ नक्षत्र आणि २१६० वर्षांनी १ पूर्ण रास किंवा महिना एवढा फरक ऋतुसापेक्ष पडत असतो. राष्ट्रीय पंचांग हे तर पूर्णपणे ग्रेगरियन कॅलेंडर प्रमाणे सायन सौर अर्थात सांपातिक वर्षाप्रमाणे असल्यामुळे ती महिन्यांची नावे मधू, माधव, शुक्र, शुची वगैरे वेदांमध्ये असलेली ऋतूवाचक स्वीकारली असती तर ते अधिक समर्पक झाले असते व राष्ट्रीय पंचांगाचे वर्ष हे सायन सौर म्हणजे, ऋतूचक्राप्रमाणे आहे हे प्रस्थापित झाले असते.

**- वासुदेव कोल्हटकर**
भ्रमणध्वनी : ९९३०५७१८१२
Email : vaskol2002@gmail.com

•••

माणसे वितंडवाद करतात; निसर्ग कृती करतो. - वोल्टेर

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

का असेना, त्यांना उपनिषद, दर्शनांचा आधार घ्यावाच लागत होता. उपनिषदं किंवा दर्शनांतील विचार आणि कर्मकांड हे सर्वथा वेगळे प्रांत आहेत. कर्मकांडातील व्यवहारांवर उपनिषदीक वा दार्शनिक विचारांचा पगडा असू शकेल, पण उपनिषद किंवा दर्शनांच्या उकलनाकरता कर्मकांडाची गरज नसते. कदाचित याचमुळे ॲलेक्झांडरपासून ते १९ व्या शतकातील जर्मन तत्त्वज्ञ शोपेनहर (Schopenhauer) पर्यंत सर्वांना मोहिनी घातली होती ती उपनिषदातील तत्त्वचिंतनाने. शोपेनहरनी एका ठिकाणी लिहून ठेवलंयः

"It is the most profitable and th most elevating reading. It has been the consolation of my life and will be the consolation of my death" (Life & Writings of Schopenhauer, W. Wallace p.106)

१५-१६ व्या शतकामध्ये युरोपमध्ये प्रबोधनयुग (Renaissance) अवतरले. त्यांना आपल्या मूळ ग्रीक व रोमन तत्त्वज्ञान व संस्कृतीमध्ये यशस्वी जगण्याची सूत्रं मिळू लागली. ख्रिस्ती धर्मग्रंथावरील त्यांचा पगडा कमी होऊन जीवनाच्या वास्तवाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन बदलायला लागला. यातूनच पुढील वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती घडली. नवीन शोधांमुळे उपलब्ध होणाऱ्या अनेक उपकरणांच्या माध्यमातून व्यवस्थांची गती आणि सुलभता दोन्ही मिळू लागल्या. यातूनच एक नवीन अर्थवाद आणि जीवनशैली विकसीत झाली. कुठल्याही गोष्टीचा यथेच्छ उपभोग हे त्यामागील एक सूत्र होते. उद्योगनिर्मिती, त्याच्याशी जोडलेला कामगार किंवा श्रमवाद, व त्यातूनच निर्माण झालेल्या वस्तुंचा उपभोग घेण्याची लालसा यातून 'चंगळवाद' जन्माला आला. या अनियंत्रित उपभोगवादामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडायला लागले आणि त्यातून पुन्हा एकदा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टीकोन मूळ पदावर यायला लागला. युरोपमधील जीवनशैली ही १९ व्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणात भौतिकतावादाकडे झुकली होती. यातून मानसिक संतुलनाप्रमाणेच, अनेक नव्या शारीरिक व्याधींनाही निमंत्रण दिले गेले. यातूनच पर्यायी व्यवस्थांचा शोध सुरू झाला.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात विल्यम जोन्स यांनी संस्कृत भाषा व त्यामधील साहित्याची खिडकी १७८९ साली 'शांकुंतल'चे इंग्रजी भाषांतर करून उघडली होती. एका वर्षातच १७९० मध्ये त्याचे जर्मनमध्ये भाषांतर झाले व पुढे इतरही युरोपीय भाषांमध्ये भाषांतर व्हायला लागली. १९ व्या शतकात कोपर्निकसपासून न्यूटनपर्यंतच्या वैज्ञानिक लिखाणाची भाषांतरे भारतात होऊ लागली. त्याच वेळेला भारतामधील उपनिषदांची भाषांतरे लॅटीनमध्ये व इतर सर्व युरोपिय भाषांमध्ये व्हायला लागली. भारतामध्ये पाश्चात्य आधुनिक विज्ञान ज्या गतीने येत होते त्याच गतीने भारतातील मध्ययुगीन व प्राचीन साहित्य, संस्कृत भाषेचे व्याकरण, आणि योग यांची निर्यात युरोपमध्ये व्हायला लागली. भारताचे पाश्चिमात्यीकरण व युरोपचे पौर्वात्तीकरण अशीच ही प्रक्रिया होती.

Peter Sloterdijk या आधुनिक जर्मन तत्त्ववेत्याने या प्रक्रियेचे वर्णन फार सुंदर केले आहे.

The Western hemisphere has begun a post-christian era, which can no longer find the necessary concepts in the holy scriptures of the Judaeo-christian traditions for a competent understanding of our time. The young conservative Otto Petras - following in the footsteps of the Left Hegelian Bruno Bauer - formulated this situation in 1935 in the still-striking intent "to demonstrate that christianity, uptill now the most powerful historical movement of our planet, has exhausted its constitutive force and that we live

post-christium in a sense that is deeper than that of the Calender"

नवभौतिकीला जन्म देणारे नील्स बॉर (Niels Bohr), हायजेनबर्ग (Heisenberg), एर्विन श्रोडिंगर (Erwin Schrodinger) ते जे रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenheimer) या सर्व विसाव्या शतकातील वैज्ञानिकांनी कुठल्या ना कुठल्या प्रकारे त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेला, किंवा संशोधनाला उपनिषदीक विचारांकडून स्फूर्ती मिळाली आहे हे त्यांनी प्रामाणिकपणे लिहून ठेवले आहे. प्रश्न आहे तो त्यांना ही उपनिषदे वाचायला कुठे व कधी मिळाली हा.

शहाजहानचा पुत्र दाराशिकोह (१६१५-१६५९) यानं सगळ्या जगावर मोठे उपकार करून ठेवले आहेत. उपनिषदांचे सिर-ए-अकबर (Sir-i-Akbar) या शीर्षकाखाली त्याने पर्शियन भाषेत भाषांतर केले. १९६२ साली इराणच्या सरकारनेही ते पुन्हा प्रकाशित केले आहे. अँक्वेतिल द्युपेरॉं (Anquetil Dupperron) यांचा जन्म १७३१ साली पॅरिसमध्ये झाला. पॅरिसमधील जगप्रसिद्ध ग्रंथालय बिब्लियोथेक नाश्योनालमध्ये अभ्यास करताना तेथील संस्कृत हस्तलिखितांशी त्यांचा संबंध आला. यातूनच त्यांचे हिंदू तत्त्वज्ञानाबद्दल कुतूहल वाढले. यामुळे तो भारतात येण्यास उद्युक्त झाला. १७५५ मध्ये फ्रेंच इस्ट इंडिया कंपनीच्या एका जहाजावरून तो भारतात आला. साहजिकच फ्रेंचांची भारतातील वसाहत पॉंडीचेरी येथे तो सुरुवातीला पोहोचला. तिथे तो संस्कृत व पर्शियन हस्तलिखिते विकत घ्यायला लागला. भारतामध्ये बऱ्याच ठिकाणी फिरल्यानंतर तो सूरतला पोहोचला व तिथेच त्याला 'आवेस्ता' हा ग्रंथ मिळाला. भारतामधील आपल्या भ्रमंतीमध्ये अनेक संस्कृत, पर्शियन ग्रंथ, नाणीही त्याने जमा केली. सहा वर्षांच्या भारतातील वास्तव्यानंतर १७६१ मध्ये तो इंग्लंडला परतला. इंग्लिश व फ्रेंच लोकांचे संबंध त्यावेळी चांगले नसल्यामुळे इंग्रजांनी त्याला तुरुंगात डांबले. ३ महिन्यांनंतर त्याची सुटका झाली. १७६२ साली तो पॅरिसला परतला. आपल्याबरोबरची सर्व संस्कृत हस्तलिखिते त्याने पॅरिसच्या ग्रंथालयास सुपूर्द केली. १७७१ मध्ये त्यांनी झेंद-अवेस्ताचे फ्रेंचमधील भाषांतर प्रकाशित केले.

द्युपेरॉंचे सर्वात मोठे योगदान म्हणजे दाराशिकोहच्या पर्शियन उपनिषदांचे त्यांनी लॅटिन व फ्रेंचमध्ये केलेले भाषांतर. त्यांचे फ्रेंच भाषांतर अप्रकाशित राहिले. मात्र लॅटीन भाषांतर १८०१-०२ मध्ये दोन खंडात प्रकाशित झाले. उपनिषदांच्या त्यांच्या या लॅटीन भाषांतराने मात्र युरोपमध्ये एक नवीन वैचारिक क्रांती केली. पुढे युरोपमधील सर्व भाषांत त्याची भाषांतरे झाली असली तरी त्याचा सर्वात मोठा प्रभाव हा जर्मनीमध्ये पडला. यातूनच अनेक जर्मन अभ्यासकांनी संस्कृतभाषा, तिचे व्याकरण, आणि वैदिक साहित्य याचा प्रचंड अभ्यास सुरू केला. August Wilhem Schlegal (1767-1845) आणि Freedrich Schlegel (1772-1829) या दोन जर्मन भावांनीही संस्कृतचा अभ्यास करून रामायण, महाभारत, भगवद्गीता यांची लॅटीन व जर्मनमध्ये भाषांतरे केली. पुढील सर्व जर्मन संस्कृत अभ्यासकांवरती श्लेगल बंधुंच्या संशोधनाचा पगडा होता. ऑगस्ट श्लेगला यांनी पहिले देवनागरी खिळे बनवून घेऊन ते बॉन, जर्मनीला आणले व तिथे त्यांनी देवनागरीतून भगवद्गीता प्रथमच छापली. युरोपमध्ये छापले गेलेले हे पहिले संस्कृत पुस्तक.

१८१८ साली पेशवाई जशी खालसा झाली व ब्रिटिशांच्या वसाहतवादाला सुरुवात झाली, तेव्हाच जर्मनीतील बॉन विद्यापीठामध्ये संस्कृत शिकवायला सुरुवात झाली. युरोपमधील भारताच्या सांस्कृतिक प्रभावाला चालना देणारी ती एक मोठी घटना होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जर्मनीमधील विद्यापीठामधून संस्कृत शिकणाऱ्या प्राध्यापकांची संख्या

ही संपूर्ण युरोपात संस्कृत शिकणाऱ्या प्राध्यापकांपेक्षा जास्त होती. १९०३ मध्ये संस्कृत व भारतशास्त्राचा (Indology) अभ्यास करणारे ४७ प्राध्यापक जर्मनीमध्ये होते. इंग्लंडमध्ये मात्र फक्त ४ विद्यापीठांमध्ये संस्कृतचे अध्ययन चालू होते. या पार्श्वभूमीवर मॅक्समूलर यांचे इंग्लंडमध्ये शिकणाऱ्या संस्कृत प्राध्यापकांबद्दलचे मत नक्कीच विचार करायला लावणारे आहे –

"Why should a study of Greek and Latin.... seem congenial to us, why should it excite even a certain enthusiasm and command general respect, while a study of sanskrit and of the ancient poetry, the philosophy, the Laws, and the art of India is looked upon, in the best case, as curious, but is considered by most people useless, tedious, if not absurd... and strange to say, this feeling exists in England more than in any other country. In France, Germany and Italy, even in Denmark, Sweden and Russia there is a vague charm... A scholar who studies Sanskrit in Germany is supposed to be initiated in the deep and dark mysteries of ancient wisdom... In England a student of sanskrit is generally considered a bore."

अनेक इंग्रज नोकरशहा आणि धर्मप्रसारकांनीही संस्कृतचा चांगलाच अभ्यास केला होता. फरक एवढाच होता की भारत ही इंग्रजांची वसाहत होती. सांस्कृतीक वर्चस्वाचे भूत त्यांच्या मानगुटीवर होते. म्हणूनच मॅक्यमूलरचे निरीक्षण महत्त्वाचे आहे. जर्मन संशोधकांचा भारत किंवा संस्कृत अभ्यासाचा संबंध हा संधोशन केंद्रित होता. आर्यवंशाच्या श्रेष्ठत्त्वाच्या जर्मन विचारालाही या संशोधनामुळे चालना मिळाली, ही दुर्देवी घटनाच म्हणायला हवी.

आजही उपनिषद आणि संस्कृतच्या व्याकरणाचे संशोधन पाश्चिमात्य जगात चालूच आहे. १५ व्या शतकात ग्रीक आणि लॅटिन भाषांच्या अभ्यासांनी युरोपमध्ये प्रबोधन यूग (Renaissance) अवतरले. त्यामुळेच वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांती झाली. १९ व्या शतकात संस्कृतच्या अभ्यासामुळे जर्मनी आणि सर्वच युरोपमध्ये आणखिन एक वैचारीक क्रांती झाली. अभ्यासक त्याला Oriental Renaissance म्हणून संबोधतात. १५ व्या शतकातील प्रबोधना एवढाच १९ व्या शतकातील या प्रबोधनामुळे युरोपला एक नवीन वैचारिक प्रगल्भता मिळाली असा अनेक अभ्यासकांचा निष्कर्ष आहे. आधुनिक अभ्यासक Doyglas J. McGetchin यांच्या शब्दात सांगायचे तर,

"Finally, Schegel's book made a call for an "Oriental renaissance" that he comparad favorably to the Italian Renaissance several centuries earlier, hoping it would prove no less grand and universal in its operation, and have no less influence on the spheric of European intelligence". (On the paths of Enlightenment, the Myth of India in Western Culture 1808-2017, p.42)

**डॉ. विजय बेडेकर**

•••


दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❊ संपर्क ❊**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.